श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ऑगस्ट १९८८

श्री

# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**

वर्ष ६७ वे | किंमत २ रुपये | अंक ५ वा

दूरध्वनी ४१२२५६१

- कार्यालय -

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

५७

चाले तळमळ माझिया जिवाची ।
दर्शनसुखाची वाट पाहे ॥
कळेना तें मला तुझें बा स्वरुप ।
बोलती अमूप भरलेलें ॥
भक्ता तुझे साह्य कार्य कारणांसी ।
प्रेमा गुंतलासी त्यांच्या तू बा ॥
असा जो तूं हरी सर्वां पाठीराखा ।
मज कां न सखा होसी बाबा ॥
माझें मन सदा वाटे मज चोर ।
देंहा या विकार जडलेला ॥
नाहीं का उपाय तुझे पासीं देवा ।
कां असे वानवा महाराजा ॥
अगा नारायणा केव्हां तूं पावसी ।
माझिया कानांसी सांग बा रे ॥
दास म्हणे असें तुझे मी अर्भक ।
म्हणुनि ही भीक मागतसें ॥

५८

शरीराचा वैरी आळस भिकारी ।
नांदतो अंतरी माझ्या कीं हो ॥
झालें पुरें वर्ष घरीं बैसुनियां ।
चोजविली काया उपचारें ॥
मनाचा विकल्प जाईना सोडुनी ।
हा तो चिकटोनी बैसलासे ॥
नको तो वायदा ठेवूंया उद्यांचा ।
साधून आजचा दिस घेऊं ॥
हरिनाम जोडूं मोठ्या आवडीनें ।
भजूं या प्रेमानें सद्‌गरुला ॥
काळ हा ईश्वर काळ हा नश्वर ।
काळ सुखकर केला जरी ॥
काळा हातीं सारें जनन मरण ।
काळ हा कारण अधःपाता ॥
नमस्कार माझा तुला काळराया ।
दास म्हणे माया भुलविते ॥

**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील**
**मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**


# श्री साईलीला - ऑगस्ट १९८८

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | तीर्थक्षेत्र शिरडी | - श्री. चंद्रशेखर जोशी | ६ |
| ३ | श्री साई उदीचा महिमा | - श्री. बबन येरम | ७ |
| ४ | मी पाहिलेले श्री साईबाबा | - श्री. पांडुरंग चंदने | ९ |
| ५ | यत्न तोचि देव जाणावा | - श्री. मधुकर अंबाडे | १५ |
| ६ | भक्तीचा महिमा | - श्री. सिताराम पवार | १८ |
| ७ | श्री समर्थ रामदासांचा व्यापक राष्ट्रधर्म | - श्री. रमेश पुंडलिक | २० |
| ८ | शिल्पकार साई | - सौ. वसुंधरा चोरे | २२ |
| ९ | साईदरबारातील माणिक आणि मोती | - सौ. विभावरी राणे | २३ |
| १० | साईबाबांचा भक्तांना उपदेश | - श्री. दि. रे. बाबरेकर | २५ |
| ११ | कोकणचे प.पू. सद्‌गुरू राऊळ महाराज | - सौ. विभावरी राणे | २७ |
| १२ | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | - साईनंद | ३३ |
| १३ | माझा फकीर | - डॉ. अनिल मोरे | ३५ |
| १४ | गुरूदेव भक्तासाठी घेतो धाव | - श्री. बाळकृष्ण देसाई | ३६ |
| १५ | ग्रंथपरिक्षण | — | ३७ |
| १६ | श्री विठ्ठलासंबंधीचे सामान्य ज्ञान | - श्री. सदानंद चेंदवणकर | ३९ |
| १७ | सत्संगाचा लाभ घ्या | - श्री. रामकृष्ण गवंडे | ४० |
| १८ | हितगुज | - सौ. अपर्णा पाठारे | ४१ |
| १९ | इति श्री साई उवाच | - श्री. डी. जी. देशपांडे | ४२ |
| २० | शिरडीनाथा | - सौ. वासंती नांदेडकर | ४५ |
| २१ | श्री साईनाथांची उदी - एक दिव्यौषधी | - मृणालिनी भुर्के | ४६ |
| २२ | मानवी जीवनाचे सार्थक | - श्री. शेषराव ठाकरे | ४७ |
| २३ | साई तारी त्याला कोण मारी | - डॉ. पी. सावंत | ४९ |
| २४ | ओढ लागली शिर्डीची | - सौ. निलिमा नाईक | ५० |
| २५ | परम कृपाळू साईबाबा | - कु. स्वाती ढमढेरे | ५१ |
| २६ | आशिष दे मज परमकृपाळा | - डॉ. राजेश परळकर | ५२ |
| २७ | आळवणी | - श्री. भास्कर जोशी | ५३ |
| २८ | प्रेमळ भगिनी - पोथी | - सौ. सुमन्नी खानविलकर | ५४ |
| २९ | श्री साई भजन | - सौ. लीला सोनावणे | ५५ |
| ३० | श्री साई तूं सर्वमंगला | - श्री. चकोर आजगांवकर | ५६ |
| ३१ | शिरडी वृत्त | — | ५८ |
| ३२ | बाबांची आरती | - डॉ. माधव दीक्षित | ६३ |
| ३३ | साईनाथा साईनाथा | - श्री. अरविंद गवई | ६४ |
| ३४ | कवडसे | - श्री. हरीभाऊ बोबडे | ६४ |

# संतांचे चमत्कार व उपकार

## संपादकीय



या जगात साक्षात्कारी संत पुरूषांनी आपल्या सामर्थ्याने मानवावर वेळोवेळी परम उपकार करून ठेवलेले आहेत. संतांनी आपल्या अतुलनीय भक्तीभावनेने परमेश्वराला संतुष्ट करून घेतले पण त्या संतोष-समाधानाचा आपल्या स्वत:करिता काहीएक उपयोग न करता, कोणत्याही प्रकारचा स्वार्थी हेतू मनात न धरता जनता जनार्दनाला आपल्या प्राप्त सामर्थ्याचा उपयोग करून दिला याबद्दल संतांच्या प्रती अत्यादर बाळगणारी सर्वच मंडळी समाजात ठायी ठायी आढळतात. संतांच्या हर एक कार्यात देव सहभागी झाला व त्याने स्वत: कष्ट करून आपल्या भक्तांच्या व्यथा दूर केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

जनाबाई ही नामदेवांची दासी होती. घरच्या सर्व कामाचा भार तिच्यावर पडला होता. पहाटे उठावे व हात दुखेपर्यंत दळण दळावे. मग लांबवर असलेल्या नदीवर जावे आणि पाणी डोहारून आणावे. नंतर सडा टाकावा, झाडझूड करावी, आंघोळ स्नानादी कर्मे करावी, चूल पेटवावी, स्वयंपाक करावा, पुन्हा नदीवर जावे, धुणे धुवावे दुपारी निसण-पुसण करावे, पुन्हा संध्याकाळी चूल पेटवावी, घरची उरलेली कामं रात्री उरकावीत, कष्टाने शरीर थकून जावे, रात्री मध्यरात्री झोपले न झोपले तोच परत पहाटेला उठावे, जात्यावरची गाणी गात गात दळण दळावे. या दैनंदिन कष्टाने जनाबाई इतकी थकून जाई की पहाटे उठून एवढे भले मोठे दळण दळण्याचे त्राण तिच्या हातात व शरीरात रहात नसे. तिच्याच्याने जाते ओढवेना अशी परिस्थिती कित्येकदा निर्माण होई. कुणीतरी मदतीला हवे असायचे पण कोण मदत करणार? त्या काळात संसाराचा हा त्रास सर्वच स्त्रियांच्या नशिबी होता. पण या जनाबाईला मात्र हा जाच फारसा सहन करावा लागत नसे. कारण प्रत्यक्ष देवच तिला दळण दळू लागायचा.

चोखामेळा हा जातीने महार होता. मेलेली गुरेढोरे ओढून नेणे हे त्याच्या जातीमुळे त्याच्याकडे आलेले काम होते. ती गुरेढोरे ओढताना त्याची खूपच ओढाताण व्हायची, अंगातून घाम फुटायचा. कुणीतरी त्याला मदत करायला हवी होती. मग देवच त्याच्या मदतीला यायचा. त्याच्या सोबत ढोरे ओढू लागायचा.

कबीर हा कोष्टी होता. धर्माने मुसलमान असून रामभक्त होता. रामनामाचा जप करता करता लुगडी विणायचा. राम त्याच्यासाठी धावून यायचा व लुगडी विणू लागायचा.

अशा प्रकारे देव भक्तांकरिता धावून येतो आणि त्यांची कामे स्वतः करू लागतो. संतांविषयीच्या अशा अनेक चमत्कारिक कथा लोकांमध्ये प्रचलित आहेत.

देव जनाबाईबरोबर दळण दळतो, नामदेवाच्या हट्टामुळे नैवेद्य खातो, चोख्याबरोबर ढोरे ओढतो, कबीराचे शेले विणतो हे सारे चमत्कार खोटे नव्हते. हे सारे चमत्कार म्हणजे थोतांड नव्हे तर त्यात भरपूर अर्थ भरलेला आहे. तो अर्थ म्हणजे भाव व भक्ती. जिथे भाव आहे तिथे भक्ती आहे व जिथे भक्ती आहे तिथे भाव आहेच. या थोर संतांच्या नंतर महाराष्ट्रात निर्माण झालेले संत श्री भगवान साईबाबा यांनीही मानव जातीवर अगणित उपकार करून ठेवलेले आहेत. बाबा शिरडीत असताना परिसरात महामारीची साथ आली असे त्यांना कळले मात्र. ते लगेच स्वतःच जात्यावर दळायला बसले. दळून आपल्या हातांनी त्यांनी धान्याचे पीठ काढले व ते पीठ शिरडीच्या सीमेवर जाऊन घातले आणि मग गावातच काय पण परिसरातही महामारीने एकाचीही लागण झाली नाही. आजही शिरडीतील जुनी मंडळी म्हणतात की या घटनेपासून तो आजतागायत महामारीची साथ उद्भवून एकही जण शिर्डीत दगावलेला नाही. साक्षात् बाबांच्या हातचे पीठ महामारीने खाल्ले आणि तिने आपले आगमन पुन्हा काही शिरडीत केलेले नाही. बाबांना जाऊन सत्तर वर्षे झालेली आहेत पण त्यांनी स्वतःहून दळलेल्या पीठात किती सामर्थ्य आहे ते पहा. खरोखरच हा चमत्कार म्हणायचा नाही तर काय?

स्वतः बाबांनी आपला चिमटा आपटून प्रज्वलित केलेला अग्नी आजही त्यांच्या भक्तमंडळीने तेवत ठेवलेला आहे व त्या अग्नीत गोवऱ्या लाकडे टाकून तयार झालेली रक्षा-उदी आपल्या भालप्रदेशाला लावून घेण्यात भक्तमंडळी धन्य मानतात. ही उदी एवढी सामर्थ्यशाली आहे की भल्या भल्या रोगांनाही टक्कर देण्याचे सामर्थ्य तीमध्ये आहे. असाच जगभरच्या भक्तांचा सार्थ अनुभव आहे.

सर्वच संतांनी आपल्या भक्तांवर पर्यायाने मानव जातीवर असेच उपकार करून ठेवलेले आहेत. त्यामुळे संतांचे स्मरण आपल्याला नेहमी होत असते.

पैसा मिळवून आणि कुटुंबियांचे पोषण करून गतानुगतिकपणे कसेतरी अटाटीचे आयुष्य कंठीत राहून एक दिवस मरण्यासाठी माझा जन्म झालेला नाही. माझ्या जीवनाचे उद्दिष्ट महान आहे— अखंड सच्चिदानंदाचा लाभच माझे लक्ष्य होय.

**— स्वामी विवेकानंद**

# श्री सद्‌गुरू साईबाबा प्रसन्न
# – तीर्थक्षेत्र शिरडी –

– श्री. चंद्रशेखर वि. जोशी
पूर्व-६, सरस्वती कॉलनी,
औरंगाबाद - ४३१००१.

आपला भारत देश हा तीर्थक्षेत्रांनी परिपूर्ण भरलेला देश आहे. हिमालयापासून ते कन्याकुमारीपर्यंत, अयोध्यापासून कलकत्त्यापर्यंत.

तीर्थक्षेत्र हे मन शांत करून देणारे स्थान आहे. आपणास यामुळे प्रत्यक्ष क्षेत्र देवतेचेच दृष्यस्वरूप तीर्थक्षेत्री पहाण्याचे भाग्य मिळते हे त्रिवार सत्य आहे.

श्री साईबाबांचे शिरडी हे असेच क्षेत्र आहे. प्रत्यक्ष परमेश्वरी अवतार श्री साईबाबा होय. अत्यंत जागृत अवस्थेत वास असलेले असे हे ठिकाण आहे.

प्रत्येकाला आपआपल्या योग्यतेप्रमाणे श्री सद्‌गुरूचा प्रसाद इथे लाभतोच आहे व लाभणार आहे. श्री सद्‌गुरूची प्राप्ती हे आपल्या जीवनातील सर्वश्रेष्ठ भाग्य.

श्री शिर्डीमधील अल्पकाळ वास्तव्य ही साईभक्तास त्याच्या जीवनातील यशाचे एक किरण दाखवून जाते. नितांत रमणीय असे असलेले हे पुण्य तीर्थक्षेत्र समस्त भारत खंड़ातील लोकांचे झाले आहे. हे स्थान बहिर्मुखी व भोगासक्त जीवालाही मोह पाडते. त्याच्यातील दोषाचा नाश करून त्याला चांगल्या मार्गाला लावण्यास परावृत्त करते. श्री साईंची ही तपोभूमी एका आगळ्यावेगळ्या सौंदर्याने व शांतीने नटलेली आहे.

श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने शिर्डीचा परिसर भारलेला आहे. एकदा येथे दर्शनास आलेल्या भक्तास पुन्हा पुन्हा दर्शनास येण्याचा मोह होतो व भक्ताची वाट पहाणारे श्री बाबा इथे आपणास कुठल्या व कोणत्या स्वरूपात दिसतील व आपणास कृतार्थ करतील ते ते स्वतःच जाणतात, समजतात, अनुभवतात. प्रयत्न तरी आपणाकडून व्हावयास नकोत का? याचा अनुभव ज्याचा त्याने घ्यावा व ज्याचा त्यानेच घ्यावा लागतो.

श्री साईंचे ते गुरूस्थान, श्री साईंचे समाधी मंदिर, श्री साईंची शिला, साईंची धुनी वगैरे ठिकाणी बाबा प्रत्यक्ष भेटतात हा स्वानुभव आहे. ओळखणाराच फक्त ओळखून जातो. प्रत्येक क्षणाला श्री साईंचा अनुभव आलेला बाबांचा भक्त मी आहे, हे आपणास मी आज सांगत आहे. प्रत्येक माझे कामात आधी श्री साईंना वंदन करून आशीर्वाद घेतला की माझे काम झाले नाही, असे कधीच होत नाही व त्याचमुळे मी बाबांच्या कृपेने आशीर्वादाने जीवनभर अननुभूत सुखानुभव घेत राहणार यात वाद नाही. आपणही बाबांवर श्रध्दा ठेवा. आपणासही बाबांचा साक्षात्कार होईल, बाबांचा कृपालाभ होईल, हे निश्चित.

अहो, बाबांना आपणाकडून काय पाहिजे, फक्त श्रद्धा व भाव पाहिजे. बाबा नेहमीच म्हणतात, जसा जसा अंतरातील भाव असेल, तसा तुम्हाला त्याचा अनुभव येईल. बाबा आपल्या वरील सर्व संकटांना सोडवितात व आपल्या संरक्षणार्थ मागेपुढे उभे राहतात. त्यांचे संरक्षण करतात. संकटाचे निवारण करतात. आपला योगक्षेम चालवितात. कठीण वाटचालीत आपला हात धरून आपणास योग्य मार्ग दाखवितात. यापेक्षा बाबा अधिक काय करू शकतील! तर सांगायचा मुद्दा हा की भक्तांनी बाबांवर श्रध्दा ठेवावी पण तीही मनातून, अंतःकरणातून थोडी सबुरी धरावी. निश्चितच चांगला अनुभव येतो. आमच्या घरातील सर्वांची श्रध्दा बाबांवर आहे म्हणूनच बाबांची आमच्यावर कृपा आहे, हे पुन्हा एकदा सांगतो.

आपणास स्वतःच बाबांच्या साक्षात्काराचे अनुभव घ्यावे लागतील. निश्चितच आपणास ते अनुभव येतील. ही माझी खात्री आहे. याकरिता आपणास बाबावर श्रध्दा मात्र निश्चितच ठेवावी लागेल.

# श्री साई उदीचा महिमा

**– श्री. बबन डी. येरम**
१/५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर, घाटकोपर,
मुंबई-४०००८६.

या जगाच्या कानाकोपऱ्यात देव कोणत्या रूपात कधी अवतार घेईल व आपले कृपाकार्य चालू ठेवील, हे सांगता येणार नाही. कधी तो अक्कलकोटस्वामींच्या रूपात, कधी गजानन महाराजांच्या रूपात तर कधी शिरडीपती साईबाबांच्या रूपात अवतार धारण करतो.

श्रीसाईबाबांना आपण ईश्वर अवतार म्हणतो. प्राचीन काळापासून अवताराच्या सत्यतेवर आपणा भारतीयांचा विश्वास आहे. "यदा यदा ही धर्मस्य..." हा गीतेतील श्लोक या अवतार कल्पनेला बळकटी देतो. ईश्वराचे स्वतःचे श्रेष्ठ स्वरूप परमोच्च स्थानी असून तेथून त्याच्या अभिव्यक्तीच्या अनेक पायऱ्या उतरत गेल्या. जाणीवयुक्त देहधारी आत्मा हा ईश्वररूप अग्नीचा एक स्फुल्लिंग आहे. मानवाच्या देहात तो आजन्म जन्म घेण्याचेही दृश्य दाखवतो. मानवी देहाचे कर्म करतो.

दुःख ही प्रकृती असली तरी त्यात मानसिक विकृतीही अधिक असते. अशा कितीतरी दुःखितांचे दुःखरोग निवारण बाबांनी आपल्या दैवी सामर्थ्याने केले आहे उदी देऊन.

जीवन्मुक्त सत्पुरूष हे प्रत्यक्ष ईश्वरच असतात. ईश्वराशी तादात्म्य पावलेले असतात. म्हणून उच्चकोटीच्या सत्पुरूषांच्या ठिकाणी ईश्वराचे गुण प्रगटलेले असतात. अशा सत्पुरूषांकडून मानवी देहाचे कल्याण करण्याचे निश्चित सामर्थ्य असते, आणि हे सामर्थ्य अप्रत्यक्ष कृपेत किंवा त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या उदीमध्ये असते. थोडक्यात, त्यांची संपूर्ण इच्छाशक्ती त्या उदीत प्रक्षेपित झालेली असते. आणि अशा विभूतीमुळे सामान्य माणसाचे लौकिक कल्याण होऊ शकते. असा आजवरचा अनुभव आहे.

पण आज चमत्काराचा भाग असा, प्रत्यक्ष साईबाबा हयात असताना त्यांनी बऱ्याच गरजू लोकांना विभूती देऊन बरे केले. पण आज साईबाबा नसतानादेखील त्यांच्या पवित्र वास्तव्याने पुनित झालेल्या समाधिस्थानातूनही नेलेली विभूती दुःखग्रस्तांना वरदान ठरत आहे.

धन्य साईबाबा व धन्य त्यांची उदी!

॥ श्रीसाई॥

# ॥ अशी श्रीसाईंची उदी॥

श्री साईंना वंदन कोटी काय गावू महिमा।
साईकृपेने पावन झालो येऊन मानवजन्मा॥
ईश्वर हा निजभक्तांचा साईरूपी अवतरला।
उदीमध्ये देऊन शक्ती दूर करी व्याधीला॥
दीनदुबळ्यांची आधार ठरली उदी संजिवनी ।
विज्ञान जेथे टेकी हात तेथे ठरली वरदायिनी॥
शेषादिक ते थकले सारे गावूनी महिमा बाबांचा।
षड्रिपुंचे करी उच्चाटन देव लाडका भक्तांचा॥

— जो मानव सर्वांशी म्हणजे प्रामाणिक, हितैषी, मित्र-शत्रु, हेवेखोर, सज्जन-दुर्जन, उदासिन, निःपक्षपाती यांच्याशी समानतेने वागतो, तो मानव विशेष योग्यतेचा आहे असे समजावे.

## माझ्या आठवणीतून

# मी पाहिलेले श्रीसाईबाबा .... ८

— **श्री. पांडुरंग दामोदर चंदने**
चाळ नं. ३, खोली नं. ८,
दुर्गा नगर, ठाणकर पाडा,
ज्ञानेश्वर (ज्ञान) मंदिरामागे,
आग्रा रोड, कल्याण (पश्चिम),
ता. कल्याण, जि. ठाणे.



माझ्या कुटुंबात (माझ्यासह) आम्ही चौघेजण आहोते, की ज्यांनी शिर्डी येथे जाऊन साईबाबांचे साक्षात् दर्शन घेतले आहे. नुसतेच दर्शन घेतले नाहीतर साईबाबां बरोबर आठ दिवसांचे वास्तव्य शिर्डी येथे केले आहे. म्हणूनच मनात विचार आले की, आपणही त्या आठवणी लिहिण्याचा प्रयत्न करू.

**आम्ही शिर्डीला का गेलो?—** आमचे वडील प.पू दामोदर नारायण चदने हे, तसे मारुतीचे उपासक होते. सर्पदंश किंवा विंचवाच्या दंशाच्या निमित्ताने निर्माण होणारे विष उतरविण्याचे काम केवळ समाजसेवा म्हणून ते करीत. एके दिवशी आमचे वडील खूपच आजारी पडले! कोणत्याच औषधाने त्यांना गुण येईना! डोके दाबले की त्यांच्या नाकातून पू - घाण बाहेर यायची - असा विचित्र आजार त्यांना झाला होता. वास्तविक ते स्वत: मारुतीचे निस्सीम उपासक असताना त्यांच्यावर अशी पाळी का यावी? असा प्रश्न आम्हास पडला. पण एखाद्या धंदेवाईक मांत्रिकाने त्यांच्यावर वाईट अशा करणीचा प्रयोग केला असावा, अशी आम्हाला शंका आली. सरतेशेवटी त्यांनी

कोणतेही औषध घेण्याचे बंद केले! त्यातच आपला अंत होणार, असे त्यांना वाटू लागले. वडिलांच्या ह्या विचित्र आजारपणात कुटुंबात मी मोठा म्हणून आम्ही सर्वच जण काळजीत पडलो पण देव तारी त्याला कोण मारी? देव अंत पहात नाही, फक्त परीक्षा पहातो. एके दिवशी स्वतःहूनच वडील बोलले की आपण शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनाला जायचे! त्यांचा हा निर्णय ऐकून घरातील सर्वांनीच सुटकेचा निश्वास सोडला. आता निदान साईबाबांकडून काही तरी मार्ग कळेल आणि आपले वडील बरे होतील, अशी आशा आम्हा सर्वांनाच वाटू लागली. श्री साईबाबांना भेटण्याची वडिलांची तीव्र इच्छा पाहून आम्ही सर्वांनीच शिर्डी येथे जाण्याची तयारी केली.

**शिर्डी येथे आम्ही कसे गेलो?-** आज सर्व साधारणपणे प्रत्येक शहरातून शिर्डी येथे जाण्यासाठी सरकारी बसगाड्या किंवा खाजगी बस गाड्या आहेत. पूर्वी तशी काहीही सोय नव्हती. म्हणून सर्व कुटुंबियांनीच शिर्डी येथे जाण्याऐवजी आम्ही चौघेजण शिर्डी येथे कोपरगाव मार्गे गेलो. सर्व प्रथम रेल्वेगाडीने कोपरगावला गेलो. नंतर कोपरगाव मार्गे शिरडी येथे गेलो. आम्हा चौघांची व्यक्तिशः नावे आणि नाते पुढीलप्रमाणे— माझे स्वतःचे नाव श्री. पांडुरंग दामोदर चंदने, वडिलांचे नाव श्री. दामोदर नारायण चंदने, मोठी बहीण श्रीमती सीताबाई नारायण तुपे (माहेरचे नाव सीताबाई दामोदर चंदने) आणि आमची आजी (वडिलांची आई) श्रीमती भागुबाई नारायण चंदने. आम्ही चौघेजण सर्वप्रथम रेल्वेने कोपरगाव येथे गेलो. तेथे ५-६ तास सर्वांनीच आजारी वडिलांसह विश्रांती घ्यावी, असे आम्हाला वाटले, पण आजारी असूनसुध्दा साईबाबांना भेटण्याची वडिलांची तीव्र इच्छा पाहून आम्ही त्वरीत कोपरगावाहून शिर्डीकडे निघालो.

**"साईबाबांच्या दरबारात आमचा प्रवेश":** शिर्डीत आम्ही चौघेजण येऊन दाखल झालो. साईबाबांची चौकशी करीत असतानाच, काही ग्रामस्थ मंडळी आमच्याबरोबर साईबाबांच्या दरबारापाशी आली. (कदाचित आमच्या आजारी वडिलांची स्थिती पाहून ते लोक आले असावेत) असो, सद्या जेथे धुनी, जाते, एक धान्याचे पोते आहे तेथेच साईबाबा बसले होते. आमच्या आजारी वडिलांना पाहून तर साईबाबा खूपच संतापले, खूप रागावले, किंबहुना साईबाबांनी आमच्या वडिलांची खूपच झाडणी केली. त्यात "तू येथे का आलास" असे साईबाबांचे वाक्य होते. आमच्या चौघांमध्ये आम्ही दोघेजण (भाऊबहीण) तर खूपच लहान (१०-१२ वर्षाचे वय) त्यात आजी तेवढी मोठी होती. साईबाबांचा संताप पाहून वडील तर खूपच घाबरले. आता काय करावे हे आमच्यापैकी कोणालाच कळेना. काही ग्रामस्थांनी तसेच आमच्या आजीने मात्र आम्हा सर्वानाच शांत राहण्याची विनंती केली. साईबाबा हे एक सद्‌गुरू आहेत, आणि आपण एक साधक आहोत, तेव्हा साधकांनी सद्‌गुरूंसमोर शांतच असावे, ह्या नात्याने एरव्ही कडक स्वभावाचे आमचे वडील, संतापलेल्या साईबाबांसमोर कमालीचे शांत राहिले. काही वेळाने साईबाबांनी आम्हा चौघांना तेथेच बसायला

सांगितले. कोठून आलात, कसे आलात अशी चौकशी केली. आम्ही साईबाबांना वडिलांच्या आजाराविषयी संपूर्ण माहिती सांगितली. त्यांना बरे वाटावे म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो आहोत, असे आत्मविश्वासपूर्वक सांगितले. साईबाबांनी काही वेळाने प्रसाद म्हणून आम्हा सर्वांनाच उदी दिली. वडिलांच्या सर्वांगाला त्यांनी उदी लावली. आता मला सांगितल्याशिवाय शिर्डीहून जायचे नाही, असे बजावून सांगितले. साईबाबांच्या सहवासात राहिलेल्या क्षणापासूनच आमच्या वडिलांना जरा बरे वाटू लागले. आम्हा सर्वांचा तो दिवस साईबाबांच्या पुढ्यातच गेला. दुसऱ्या दिवसापासून आमची व्यवस्था तेथील एका कुडाच्या तसेच शेणाने सारविलेल्या झोपडीत झाली.

**शिर्डीचे पूर्वीचे व्यवस्थापन:** आम्ही स्वत: ७०-७५ वर्षापूर्वी पाहिलेली शिर्डी आणि आज ह्या क्षणाला साकार झालेल्या शिर्डीमध्ये फारच फरक आहे. साईबाबांच्या दर्शनासाठी तसेच मुक्कामासाठी येणाऱ्या भक्तांसाठी पूर्वी कुडाच्या तसेच शेणांनी सारविलेल्या झोपड्या होत्या. जेवणाची व्यवस्था तर खूपच निराळी होती. साईबाबा स्वत: भिक्षा मागत, सर्वांना वाटून थोडेसे जे शिल्लक राही तेच ते खात. शिवाय भक्तगणांनी आणलेले पेढे, फळे, नारळ, बर्फी हे सुध्दा साईबाबा सर्वांना वाटून टाकीत. कुत्रा, मांजर ह्या सारख्या मुक्या प्राण्यांना सुध्दा साईबाबा आग्रहाने जेऊ घालीत. शिर्डी येथे वास्तव्य करणारी लक्ष्मीबाई रोज साईबाबांसाठी भाकर भाजी आणीत असे. (ह्याच लक्ष्मी बाईंना साईबाबांनी शेवटी नऊ चांदीचे रूपये दिले होते) काही वकिली पेशा करणारे तसेच मुंबई अथवा अन्य ठिकाणच्या बाजारपेठेत व्यवसाय करणारे व्यापारी सुध्दा शिर्डी येथे बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची सर्व प्रकारे व्यवस्था करीत. येणाऱ्या प्रत्येक भक्ताकडे साईबाबा दक्षिणा मागीत. त्या दक्षिणेचा उपयोग शेवटी बाबा सर्वांसाठीच करायचे.

**शिर्डी गावातच साईबाबांना आम्ही कोठे कोठे पाहिले?:** स्वत: बाबा कधी कधी निंब वृक्षाखाली बसून येणाऱ्या भक्तांची गाऱ्हाणी ऐकत, तर कधी लेंडी बागेत, तर कधी मशीदीत, कधी-कधी बाबा जेथे धुनी आहे, तेथे बसूनच इतरांकडून आरती करून घेत. बाबांच्या अवतीभवती लहान मुलांचा तर घोळकाच असायचा. त्यावेळेस आम्ही तर १०-१२ वर्षाची मुले होतो. बाबा आम्हाला त्यांच्या समोर ठेवलेली फळे - फुले, पेढे, बर्फी अगदी आतुरतेने देत असत. किंबहुना आम्ही बाबांच्या अंगाखांद्यावरच खेळायचो. त्यांचे पाय चेपून द्यायचो. त्यावेळेस आम्हाला एक चमत्कार दिसला आणि तो म्हणजे बाबांचे पाय हे कणकेच्या गोळ्या प्रमाणे वाटायचे पायाचे हाड आमच्या हाताला कधीच जाणवले नाही.

**साईबाबांच्या समोर आम्ही पाहिलेला एक दुर्मिळ चमत्कार:** आमचा मुक्काम शिर्डी येथे असतानाच एकदा एक जोडपे साईबाबांना भेटायला आले. त्यांना संतती नव्हती, हे सांगण्यासाठी ते साईबाबांकडे आले होते. पण वाटेत प्रवासातच त्या बाईची सोन्याची नथ हरवली. बाईचे असे मत होते की संतती नाही झाली तरी चालेल, पण माझी सोन्याची नथ मिळाली पाहिजे, असेच साईबाबांना सांगायचे. शेवटी

साईबाबांसमोर जेव्हा ते दोघे येतात तेव्हा काहीच बोलत नाहीत. साईबाबासुध्दा काहीच बोलत नाहीत. १०/१५ मिनिटांनी साईबाबा त्या दोघांना मिळून एक नारळ प्रसाद म्हणून देतात. हा नारळ तुम्ही दोघांनी प्रसाद म्हणून खावा, एवढेच साईबाबा बोलतात आणि त्या दोघांना जायला सांगतात. हरवलेली नथ आणि संतती नाही ह्या दोन गोष्टींवर आपल्याला बोलता आले नाही आणि साईबाबा सुध्दा त्या विषयावर काही बोलले नाहीत म्हणून मनातून नाराज होतात. संध्याकाळची वेळ म्हणून ते जोडपे आमच्याप्रमाणेच कुडाच्या तसेच शेणाने सारवलेल्या झोपडीत राहण्यासाठी आले. प्रसाद म्हणून आणलेला नारळ त्यांनी फोडला तर त्या नारळातूनच बाईची हरवलेली नथ निघाली!! दोघांनाही खूप आनंद झाला. त्या नारळाच्या दोन्ही वाट्या तेथेच टाकून ते दोघेजण ती नथ घेऊन पुन्हा साईबाबांकडे गेले. हरवलेली नथ सापडली असे सांगताच साईबाबा भडकले आणि म्हणाले तुमची नथ हरवली आहे हे मी अंतर्ज्ञानाने जाणले, तसेच तुम्हाला संतती नाही हे सुध्दा अंतर्ज्ञानाने जाणले, तसेच शिर्डीच्या एकाच खेपेत तुमची दोन कामे व्हावीत या हेतूने मी तुम्हाला नारळ दिला. जो नारळ मी तुम्हाला प्रसाद म्हणून दिला तो तेथेच टाकून तुम्ही माझ्याकडे कां आलात? तुम्ही पुन्हा माघारी जा. तो नारळ फक्त तुम्ही दोघांनीच प्रसाद म्हणून खा, त्याने तुमचा अडलेला मार्ग मोकळा होईल. शिर्डीत आम्ही सर्वांनीच पाहिलेला हा चमत्कार आमच्या सर्वांच्या निरंतर लक्षात राहील. आम्ही तसे वयाने लहान तरी सुध्दा त्या बालमनाला तो चमत्कार एक निराळाच चटका लावून गेला. आमचे वडील सुध्दा आता नक्कीच बरे होणार, ह्या आत्मविश्वासात आम्ही साईबाबांसमोर रोज नतमस्तक व्हायचो!

**आमचे वडील आणि साईबाबा:** आमच्या वडिलांचा आजार पाहून साईबाबा स्वतः त्यांच्या अंगाला उदी लावीत. त्या ७/८ दिवसांच्या कालावधीत आमच्या वडिलांच्या प्रकृतीत खूपच फरक पडला. डोके दाबले की नाकातून पू घाण बाहेर येण्याची क्रिया तर अजिबात बंद झाली होती. वडिलांची ती सुधारलेली तब्येत पाहून आम्हा भावंडांना सुध्दा खूप आनंद झाला. सुरवातीला पहिल्याच दिवशी साईबाबा आमच्या वडिलांवर खूप संतापले होते. तेव्हा आम्ही भावंडे तर खूपच घाबरलो होतो. कारण त्यावेळेस आमचे वय तर खूपच लहान होते. पण त्यावेळेस आमच्याबरोबर असलेल्या आमच्या आजीने आमची चांगलीच वैचारिक समजूत काढली की, "साईबाबा हे कोणत्याही व्यक्तीवर रागवत नाहीत, तर त्या व्यक्तीच्या पाठीमागे तसेच अवतीभवती वावरणाऱ्या काळ्याकुट्ट शक्तींवर ते रागवत असतात, की जेणेकरून त्यांनी दूर पळून जावे! तसेच त्या व्यक्तीच्या पाठीमागे असणारी रोगराई, पीडा, कटकटी इत्यादींवर साईबाबा रागवतात. सद्गुरू संतापले असता साधकानी तर शांतच राहून त्यांचे पाय धरावे" असो.

**शिर्डीहून पुन्हा माघारी:** अशा प्रकारे शिर्डी येथे आम्ही ६/७ दिवस राहिलो. साईबाबांनी घरी जायला परवानगी दिली. शिर्डीहून निघताना तर आम्हा सर्वांचेच

अंत:करण जड झाले. शिर्डीत साईबाबांच्या सहवासात दिवस कसे गेले,ते कळलेच नाही. तेथून निघताना आम्हा सर्वांनाच गहिवरून आले. आता साईबाबांचे उपकार कसे फेडायचे असे आम्ही बोलणार,इतक्यात साईबाबा पुन्हा जोरात म्हणाले, "आता पुन्हा माझ्याकडे येऊ नकोस" साईबाबांचे ते वाक्य आमच्या वडिलांच्या अंत:करणास जाऊन भिडले. साईबाबा असे का म्हणत आहेत,हे त्यांना उमजेना. आमचे वडील तसे मारूतीचे उपासक होते. कदाचित साईबाबांचे कार्य संपले असावे, असे विचार आमच्या वडिलांच्या मनाला चाटून गेले. (आणि वाचकहो, त्यानंतर एक वर्षानी खरोखरीच साईबाबांनी देह ठेवला) साईबाबांचे ते वाक्य ऐकून आमच्या वडिलांचे डोळे पाणावले. डोळ्यांतील ते आनंदाश्रू (कि दु:खाश्रू) गाळीत त्यांनी साईबाबांना कळवळून म्हटले,"ठीक आहे, मी तुमच्याकडे कधीही येणार नाही पण त्यासाठी मला पोट भरून आशीर्वाद द्या!" त्यावर दयेचा सागर असलेले साईबाबा सुध्दा म्हणाले, "अरे तुझे सगळे वंश मी पोषीन, काळजी करू नकोस. आपली ओळखही जन्मोजन्मीची आहे." अशा प्रकारे शिर्डीच्या साईबाबांचे आशीर्वाद घेऊन आम्ही घरी परतलो. त्यानंतर फारतर एका वर्षाचाच कालावधी गेला असेल. बातमी कानावर आली, साईबाबा गेले! बरोबर एक वर्षापूर्वी साईबाबा आमच्या वडिलांना बोलले होते की "तू माझ्याकडे परत येऊ नकोस!" ह्या त्यांच्या वाक्यात फार मोठा गूढ अर्थ होता. किंबहुना माझे काय आता संपत आले आहे, तुमच्या घरीच तुम्ही माझी सेवा करा, असाच त्याचा अर्थ होता. (हा अर्थ आम्हाला एका वर्षानी कळला. पण एक साधक ह्या नात्यांनी आमच्या वडिलांनी ही घटना अगदी अचूक ओळखली होती.)

**साईबाबांचा सहवास आणि माझी जीवनगाथा:** मित्रहो, असा हा साईबाबांचा प्रत्यक्ष अनुभव लाभला. माझे वय आहे ऐंशीच्या पुढे.सौभाग्यवती ७५ वर्षाच्या आहेत. एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. कदाचित् साईबाबांच्या आशीर्वादाने मला पणजोबा होण्याचे भाग्य सुध्दा मिळेल! एक मुलगी पनवेल येथे असते (श्री. लाड, मिरची गल्ली) तर दुसरी मुलगी आणि एकुलता एक मुलगा कल्याण येथे! आयुष्यात संकटे अनेक आली. दिवस कसे काढले ते साईबाबांनाच माहीत! परिस्थिती कोणालाही सांगू नये असे म्हणतात! मनातून आम्हास खूप वाटे की आपण गरुडासारखी उंच भरारी मारावी, पण त्या वेळची आमची परिस्थिती सांगायची की तुम्ही "गुरूडापेक्षा चिमणीचीच झेप घ्या! सगळे दिवस सारखे नसतात. पण साईबाबांच्या श्रध्दा-सबुरीने जगविले. अपत्ये व्यवस्थित रीतसर जन्माला येऊन स्वर्गवासी होण्याची दु:खे सुध्दा खूप सोसली. एक बावीस वर्षाचा कर्ता करविता "शरद" नावाचा मुलगा अचानक स्वर्गवासी झाल्याचे दु:ख पचविताना पुन्हा पुन्हा साईबाबांची श्रध्दा-सबुरी ही वचने आठवायची. तेव्हा सुध्दा साईकृपेने देवकी माता आठवली की जिने स्वत:ची हक्काची रीतसर जन्माला घातलेली एकूण सात अपत्ये गमवल्याचे दु:ख पचविले! आपण तर किस झाड की पत्ती! व्यवसायाने मी कल्याण येथील एका गुजराथी शाळेतून शिपाई म्हणून निवृत्त झालो. सद्या वय ८० नाबाद. मी

स्वतः, सौभाग्यवती, एक मुलगा, सूनबाई, नातवंडे असे एकत्रितरित्या कल्याण येथे राहतो. सतत नामस्मरण, कथा-किर्तन-प्रवचन ऐकण्याची आवड आहे. कल्याण येथे आमच्या राहत्या घराशेजारीच ज्ञानेश्वर (ज्ञान) मंदिर आहे. तेथे नित्यनियमित कथा कीर्तन-प्रवचन ऐकण्यासाठी जाण्याचा प्रयत्न करतो. शिर्डीहून परतताना श्री साईबाबांनी जो आशीर्वाद दिला की तुझे सर्व वंश मी पोसीन, तू पुन्हा माझ्याकडे येऊ नकोस ह्या त्यांच्या वाक्याची प्रचिती आता साठ वर्षानंतरसुध्दा,आली. कारण आता आमच्या दुसऱ्या पिढीत मुलांचीच संख्या जास्त आहे. म्हणजे अप्रत्यक्षपणे साईबाबांनी आमच्या पुढील पिढींना पुत्रसंततीचा आशीर्वाद दिला आहे.

**सद्या आमच्या कुटुंबियांकडून होत असलेली ईश्वर सेवाः** आमच्या राहत्या घराशेजारीच ज्ञानेश्वर (ज्ञान) मंदिर आहे, तेथे मी नित्य नियमित कथा-कीर्तन ऐकण्याच्या निमित्ताने जात असतो. आम्ही एकूण चार भाऊ मी स्वतः पांडुरंग, दत्तात्रय, शंकर, गजानन त्यापैकी एक छोटा भाऊ श्री. शंकरराव दा. चंदने उप-जिल्हा अधिकारी म्हणून निवृत्त झाला. एकूण कुटुंबात श्री साईबाबा ज्यांना सद्‌गुरू मानायचे त्या श्री स्वामी समर्थ अक्कलकोट ह्यांची उपासना आहे.. म्हणजे श्री साईबाबा आमच्याकडून त्यांच्या सद्‌गुरूंचीच उपासना करून घेत आहेत. एक पुतण्या श्री. संजीव गजानन चंदने हा सुध्दा अध्यात्म, परमार्थ, पदयात्रा ह्या प्रांतात आघाडीवर वाटतो. तो साईलीला मासिकाचा लेखक/कवी सुध्दा आहे. सद्या त्याचे वास्तव्य कल्याण येथे तिसगाव नाक्यावरील गोडसे च्राळीत आहे. त्यांच्या घरासमोर श्री. सूर्यवंशी बाबांनी साकार केलेले श्री साईबाबा, श्री स्वामी समर्थ, अक्कलकोट व गजानन महाराज,शेगाव ह्यांचे सुंदर मंदिर आहे. हा सुध्दा एक विलोभनीय असा योग आहे. ठाण्याचे श्री. मुकुंद महेश्वर तथा नाना करंदीकर ह्यांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी समर्थ परिवार ह्या संस्थेत हा पुतण्या काम करताना आढळतो. त्या संस्थेने स्वामी भवन, नांगरगाव, लोणावळा येथे श्री स्वामी समर्थ अक्कलकोट ह्यांची साडेसहा फूट उंचीची एक हजार किलो वजनाची तांब्याची मूर्ती साकार केली असून मूर्तीच्या चरणाशी श्री स्वामी समर्थ हा चौवीस कोटी जप लेखी ठेवला आहे. अशा अभूतपूर्व संस्थेशी संपर्क येणे,हा सुध्दा साईबाबा कृपेने चालून आलेला योगायोग आहे.

सद्या वय ऐंशीच्या पुढे म्हणजे शरीर तर थकले आहेच. हे सर्व विचार लिहून काढताना पुतण्या, नात, सूनबाई ह्या सर्वांचीच मदत घेतली आहे. मला लिहीता-वाचता येते, पण शरीर आता तितकेसे साथ देत नाही. इयत्ता आठवीत शिकत असलेली माझी एक नात चि. उज्वला हिने मी सांगितलेली ही सर्व माहिती प्रश्नोत्तर रूपाने लिहून काढायचा प्रयत्न केला. त्याचे शब्दांकन करण्याचा प्रयत्न चि. संजीव ह्या पुतण्याने केला आहे.

# यत्न तोचि देव जाणावा!

– श्री. मधुकर अंबाडे
अंबाडे हाऊस, लकडी पुलासमोर,
प्रधानमार्ग, बडोदा, गुजरात राज्य

साईभक्तांनो! आपण आपणास साईभक्त म्हणवून घेतो. आपण साईची भक्तीही करतो. पण आपण खऱ्या अर्थाने साईभक्त आहोत का? ह्या मोठ्या अंतर्मुखतेने विचार करण्यासारख्या प्रश्नावर कधी आपण विचार करतो का? रोज नुसती श्रीबाबांची पूजा करणे, उदी लावणे, गुरूवार करणे, शिरडीस जाणे म्हणजे का साईभक्ती? त्यात भावनेची उत्कटता किती असते, ह्यालाच जास्त महत्व नाही का?

आपल्यापुरती नुसती बाबांची भक्ती करून दुसऱ्याच्या हिताची, कल्याणाची भावना जर नसेल, तर ती स्वार्थी साईभक्ती नाही का म्हणता येणार? दीन दु:खितांसाठी कधी आपला अंतरात्मा कळवळतो का? अशा दीन दु:खितांच्या रूपातच आपल्या आजूबाजूला येऊन साई आपली परीक्षा घेत असतो. ज्याला साईच्या दिव्य शक्तीचा, ईश्वरत्वाचा जर काही अनुभव प्रत्ययास आला असेल, तर तो खऱ्या अर्थाने साईभक्त म्हणावा का? अनुभव, प्रचिती, आपले पूर्व सुकृतही असू शकेल? श्रीबाबांची कृपाही असू शकेल? ती प्रचिती आपल्या कुणा अजाण हितचिंतकाच्या अतूट श्रद्धेचा परिणाम रूपही असू शकते. भक्तांनो! साईच्या दिव्य शक्तीची प्रचिती आल्यास त्या दिव्य आणि अलौकिक शक्तीत निरंतर मन, बुध्दी, चित्त एकाग्र करण्याचा साईसंकेत आहे, ह्याकडे चुकूनही दुर्लक्ष होऊ देऊ नका. तसा आपण प्रयत्न करतो का? दीन दु:खीतांची सेवा (गुप्त रीतीने असल्यास उत्तम), सर्वांविषयी समभाव, सातत्यानं शुध्द चित्त ठेवून साईमय होण्याचा आपण यत्न करीत असलो, तरच खऱ्या अर्थाने आपणास साईभक्त म्हणवून घेणे योग्य ठरेल. आपणच आपल्या विवेकाच्या आधारे हे ठरवू शकतो, दुसऱ्याने सांगणे नको. प्रचिती आलेले साईभक्त बंधु-भगिनी मोठे भाग्यवान! त्यांचे तर अर्धे अधिक कार्य श्रीबाबांनी सुलभ केले. त्यांच्या मनमंदिरी अनन्य श्रध्दाभाव श्रीबाबांनीच दृढ केला. आता फक्त त्याला टिकविणे व त्यात वृध्दी करणे एवढेच! त्यासाठी हवे सतत नामस्मरण!! नामस्मरणासाठी हवा फक्त यत्न!!!

जो ईश्वरालाही मानत नाही, साईशक्तीची ज्यास प्रचितीही नाही, पण त्याला कुणाचंही दु:ख बघवत नाही, कुठलंही खोटं काम करण्याचं ज्याचं मनच होत नाही, कुणाच्याही दु:खात दु:खी व सुखात सुखी होण्याची ज्याची जन्मत:च भावना आहे, त्यालाही साईभक्त नाही का म्हणता येणार? साई हा मोठा व्यापक शब्द आहे. साई म्हणजेच साक्षात ईश्वर! साई म्हणजेच अल्लाह मालिक! महम्मद पैगंबर! साई म्हणजेच येशू ख्रिस्त! गुरुनानक! गौतम बुद्ध! महावीर! आमच्यात तो विवेक रूपात व्याप्त आहेच, शिवाय भूचर, खेचर, जलचर सर्व प्राण्यांमध्येही तो आहे. म्हणूनच साईमय होण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्यास काहीही करण्याचे बाकी उरत

नाही. जो खऱ्या अर्थाने साईभक्त, तोच खराखुरा हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे आणि तोच मानव. मग तेथे जातीधर्माची देशकाळाची दरी रहातच नाही. असे जेव्हा व्यापक स्वरुपात घडते तेव्हा धर्माच्या नावाखाली अज्ञानता उरतच नाही. धर्मांध होऊन हिंसा होऊच शकत नाही. हवा तो केवळ यत्न! नुसता यत्नही आपण करू शकत नाही का?

आजपासून नव्हे पण आत्तापासूनच आपण खऱ्या अर्थाने साईभक्त होण्याचा यत्न करूया. तो साई कृपावंत, दयावंत तर आहेच. मग चिंता कशाची? पण आपल्या प्रयत्नांतही सचोटी हवी. लोकांमध्ये आपण चांगले आहोत,हे आपल्या स्वार्थी वृत्तीतून सिध्द करण्यासाठी सेवेचे कार्य आपण हाती घेत तर नाही ना? फार जपलं पाहिजे आपण आपली फसवणूक करून घेतल्यागत होण्याची फार शक्यता आहे. आपला दंभ आपल्याला ओळखता येत नाही. अधिक मान मिळावा म्हणून मानाचा त्याग करण्याचे नाटक तर आपल्यालाही न कळत आपल्याकडून होत नाही ना? साईनामस्मरणात आपलं मन एकाग्र होतं का? कामक्रोधादि विकारांपासून आपण आपणास दूर ठेवून साईमय होण्याचा प्रामाणिक यत्न अत्यावश्यक आहे. अन्यथा त्याचे अमृतमय सुवर्ण कृपापात्र जाणून बुजून ओतून दिल्यासारखेच होईल! निरंतर नामस्मरणात चिंतनात मनाला एकाग्र करण्याचा यत्न परम आवश्यक आहे.

प्रिय, आत्मीय साईबंधुंनो, याहीपेक्षा अधिक सर्वांगीण विचाराने अंतर्मुख होऊन प्रामाणिकपणे यत्न करून यथार्थ रीतीने आपण साईभक्तीला लागू. त्यानेच दिलेल्या सर्वशक्तीनं नौका भवपार करण्यास त्याने (ईश्वराने) कठीण अशी कुठलीही अडचण ठेवलेली नाहीच. अडचणी आहेत त्या आपण उपस्थित केलेल्या असतात, मानलेल्या असतात. आजपावेतो दु:खांमुळेच अनेक थोर महात्म्यांचे घडण झाले, आणि त्या दु:खांपासून आम्ही दूर पळतो. किती दयनीय अवस्था करून घेतो आम्ही आमची! अविनाशी तत्त्व प्राप्त करण्याचा यत्न न करता विनाशी गोष्टींसाठी अनमोल व अद्भुत शरीर-साधन आणि उभं आयुष्य वाया घालवत असतो आपण!

कृपावंत, दयावंत, महासंत साई समर्थ आहेच, आहे! शबरीची नवविधा भक्ती आपण जाणून घेऊन तिच्यासारखे उत्तम साईरामभक्त बनण्याचा प्रयत्न तरी करणे आपले परम् कर्तव्य नाही का? थोड्या थोडक्यांनी नव्हे असंख्य भक्तांनी भक्तीचे सर्वश्रेष्ठ पद प्राप्त केलेले आहे. कलयुगातीलही अनेक उदाहरणे देता येतील. जलाराम संसारी होते. तुकाराम, नामदेव, जनाबाई, नरसिंह मेहता, गोरा कुंभार, मीराबाई, आपाधना (काठ्यावाड), श्रीबाबांच्या वेळच्या राधाकृष्णाआई, म्हाळसापती, नुकतेच सुमारे १९८३ साली निर्वाण झालेले श्रीबाबांचे महान भक्त प.पू. साईशरणानंदजी वगैरे. आजही असे अनामिक अज्ञात भक्त अनेक आहेत. तुम्हा आम्हालाही ते शक्य आहे, सुलभ आहे. पण मुळात आपण अवघड आहे अशी समजूत करून घेऊन प्रयत्न तर दूरच परंतु त्या दिशेकडे वळत सुध्दा नाही. आपल्यापैकी शिक्षित वर्ग सुध्दा दिव्य शक्तीला बुध्दीचा मापदंड लावून काही गोष्टी हसण्यावारी नेतो. त्यामुळे अश्रध्देची बीजं नकळत अनेक मनात पेरली जातात. यत्न न केल्या

मनाच्या दिव्य अशा प्रचंड शक्तीला आपण धुळीशी मिळविण्याची साधीसुधी नव्हे मोठ्ठी चूक नेहमी करीत असतो. सहजपणे बोलून जातो, 'आपल्याच्याने ते होणार नाही' परिणामी शक्य गोष्टीला अशक्य करून ठेवतो. आपणच आपले मन दुबळे करून घेतो. अशा अनेक चुका आपण करत रहातो. चुका झाल्या त्याची चिंता नको. पण एकदा का पश्चात्तापे जागृती प्राप्त करून पुन:पुन्हा चूक न करण्याचा निश्चय जर केला, तर विजय आपला! निश्चय हाचि विजय! संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची आठवण होते.

'निश्चयाचे बळ तुका म्हणे हेचि फळ'

आपण सुशुप्त अवस्थेतच वावरत असतो. म्हणून आपल्याकडून क्रोध होऊन जातो. त्यानंतर आपल्याला पश्चात्ताप होतो. पश्चात्तापासमयी जी स्थिती ती जागृत स्थिती. त्या स्थितीत निश्चय होऊ शकतो. ईश्वरसमीप दु:खातच जास्तीत जास्त जाता येतं. भावबळ निर्माण होऊन प्रचिती आल्यावाचून रहात नाही.

पर्वतारोहण करताना काय जीवावरील संकटे, अडचणी येत नसतात? पण आपण माणसंच त्यावेळी आपल्यातील विश्वास दृढ करून, धाडस करून, मनाचा निश्चय करून, त्या अडचणींच्या पार उतरतो की नाही? तुकाराम वगैरेंसारखे थोर संत सांगतात, ईश्वर प्राप्ती इतकी सुलभ गोष्ट दुसरी कुठलीच नाही. आता आपण आपल्या मनाशी विचार करू, की नामस्मरणात जीवावरील संकटे येतात का कधी? पण आपल्याला नडत असते ती आपली चतुराई, दुसरं काही नाही! काट्यानं काटा निघतो, फुलानं नाही! सावधानता हवीच!!

जी साधना साधकाला प्रिय ती साधना त्या साधकासाठी योग्य. साधना कुठलीही असो साधकाला प्रिय असणे अत्यावश्यक आहे. सर्वभावे, श्रध्दा, सबुरीने यत्न करून कुठलाही साधक परम् पदाची प्राप्ती करू शकतो. आपणास प्रिय आणि सर्वरीतीने शक्य अशा कुठल्याही साधनेच्या योगे आपण उचित दिशेने वाटचाल करू शकतो. पण दिशाभूल नको. स्वत:चीच फसवणूक नको. अन्यथा अज्ञानाच्या निबिड अंधकारात भटकणे. अशातच अज्ञानजन्य ज्ञान चित्तात ठसलं तर मग खऱ्या ज्ञानाचा प्रकाश पडणे कठीण होऊन बसते. शास्त्रसंमत, संतसंमत उचित दिशा, आणि यत्नपूर्वक वाटचाल व्हावी. ध्येयप्राप्तीचा लाभ त्यांना होतोच होतो, जे ध्येय प्राप्तीच्या उचित दिशेने वाटचाल करतात. आदरणीय भक्तांनो! अपयशात उदासीनता येऊच देऊ नका. प्रसन्नता तर जराही गमवू नका. अपयशात देखील काही एक प्रमाणात यश हे लपलेलं असतं!! ते प्रमाण वाढविण्याचा यत्न, म्हणजेच देव!!! समर्थ रामदास स्वामींच्या उक्तीत गूढार्थ भरलेला आहे– 'यत्न तोचि देव जाणावा'

जगात प्रलोभनीय सर्व नाशिवंत वस्तूंच्या लोभात न पडता खऱ्या अर्थाने साईभक्तीत जर आम्ही पडलो, तर जीवन कृतार्थ, शिवाय मृत्यूनंतरचेही जीवन असते, तेही कृतार्थ होईल! श्रध्दा, सबुरी आणि यत्ना आधारे आत्मकल्याणाचा अमृत घट साईकृपेने असायास निश्चित प्राप्त करून घेता येईल!!

ॐ श्रीसाईनाथाय नम:

# "भक्तीचा महिमा"

– श्री. सिताराम नारायण पवा
१३/२ प्रतिरक्षा नगर,
वाकोला ब्रिज,
सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई नं. ४०००५५

ह्या घोर कलियुगात सर्वसाधारण माणसाचा बहुमूल्य वेळ प्रपंचात किंवा संसारात गुरफटलेल्या त्याच्या नातलगांच्या आणि मित्रांच्या संगतीत जात असतो. ईश्वराच्या नामस्मरणासाठी त्याला मुळी वेळच मिळत नाही. मनुष्य जन्माचे त्याचे बालपण व तारूण्य ईश्वराच्या नामस्मरणाविना जाते. म्हातारपणी त्याला ईश्वराची आठवण होते. पण शरीराची शक्ती क्षीण झाल्यामुळे तो अध्यात्म मार्गाकडे सहसा वळत नाही. जीभ बरोबर वळत नाही, कारण त्याच्या चित्ताची एकाग्रताच मुळी होत नाही.

सर्वसाधारण माणूस अज्ञान वश आपापल्या जवळच्या संबंधितांच्या मोहाला बळी पडून अशाश्वत सुखासाठी खोटी नाटी कर्मे करीत असतो. ह्यामुळे तो शाश्वत आनंदास मुकतो व "पुनरपी जननम् पुनरपी मरणम्" या वर्तुळात फसून अनंत काळ दुःखे व कष्ट भोगत असतो. कर्माप्रमाणे निरनिराळ्या योनीत भटकत असतो. शेवटी मनुष्य जन्मात परत येतो तेव्हा त्याला नवीन कर्म करण्याचा अधिकार ईश्वराकडून मिळतो. कारण मनुष्य योनी ही कर्म योनी आहे. मनुष्येतर इतर सर्व योनी ह्या केवळ भोग योनी असतात. त्या योनीमध्ये कर्म करण्याचा अधिकार नसतो.

मनुष्य योनी ही कर्मयोनी असल्यामुळे प्रत्येक माणसाने आपापली कर्तव्यकर्मे योग्य रीतीने, साधुसंतानी सांगितल्याप्रमाणे आपापल्या जिवलगांसाठी अवश्य करावीत. पण भौतिक सुखे मिळविण्याच्या इच्छेने खोटी नाटी लबाडीची कर्मे करून आपले आत्मिक अधःपतन करून घेऊ नये. ह्या जगात सद्‌गुरू व साधुसंतांव्यतिरिक्त आपले कोणीच नाही, हे नेहमी ध्यानात ठेवावे. जो समर्थ अंधारातून प्रकाशाकडे नेतो म्हणजेच आपले अज्ञान दूर करून आपणास ज्ञान प्राप्त करून देतो तोच गुरू.

साधुसंतांनी चोखाळलेल्या भक्तीमार्गाने जाण्यासाठी प्रथम आपले आचरण शुध्द ठेवले पाहिजे. सत्पुरूषांनी निंदिलेले आचरण वर्ज्य करून त्यांनी वंदिलेले आचरण ठेवले पाहिजे. दररोज पहाटे उठून आपापल्या इष्ट देवतेची कळवळून प्रार्थना करून देवाला सांगावे की देवा, मला प्रापंचिक सुखात गुरफटलेल्या माझ्या नातलगांपासून आणि मित्रांपासून वाचव, म्हणजे माझा मनुष्य जन्माचा अमूल्य वेळ

त्यांच्या संगतीत वाया न जाता ईश्वराच्या नामस्मरणात घालविता येईल. उत्कट भक्तीमुळे दीन अवस्थेत पोहचलेला मनुष्यसुध्दा ईश्वरनिष्ठ होऊ शकतो. पण त्यासाठी खऱ्याखुऱ्या उत्कट भक्तीची आवश्यकता आहे. आपणास दुर्लभ असा हा मनुष्य जन्म मिळालेला आहे, तो दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी आहे. हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. जर त्या सत्कृत्यांचा सुगंध आपल्या पश्चात्सुध्दा अनंतकाळ दरवळत राहील. येईल त्या परिस्थितीशी टक्कर देण्याची मनाची नेहमीच तयारी ठेवली पाहिजे. जे आपणास प्राप्त झाले आहे, ते आपल्या पूर्व कर्माचे फळ आहे, असे मानून त्यातच आनंद मानण्याची वृत्ती ठेवली पाहिजे. निर्भेळ सुख असे जगात आहे तरी काय? असा सुखी कोण आहे? आपापल्या कर्माप्रमाणे जो तो सुख-दुःख भोगत असतो. आपल्या नश्वर देहाविषयी आपण दुःख करता नये. आपण ज्या ज्या वैभवाला भुलतो व ते न मिळाल्यास दुःखी होतो. ते सारे वैभव अशाश्वत आहे. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. चौदा चौकड्यांच्या राज्याचा राजा रावण आज कोठे आहे? जन्माला आला तो मेला. हा मुळी मृत्यूलोकच आहे. तरी देखील जो तो आपापल्या गर्वात आहे. सर्वच मरणार तेथे कोणी कोणासाठी रडावे? सदा सर्वकाळ परमेश्वराचे नामस्मरण करावे. त्यासाठी देहाला कष्ट पडले तरी चालतील, आज ना उद्या देह हा पडणारच! भक्तांचे रक्षण करण्यासाठी परमेश्वर समर्थ आहे. त्याच्यावर भार टाकून आपण निश्चिंत रहावे.

मी कोण आहे? कोठून या मनुष्य जन्माला आलो? देह पडल्यावर कोठे जाणार? हे प्रश्न ज्याने त्याने आपापल्या मनास विचारले पाहिजेत. आपल्या शरीरात लहानपणापासून आतापर्यंत बदल होत गेले आहेत. तसेच देह पडेपर्यंत पुढेही बदल होत जाणार आहेत. आपला आत्मा जो या शरीरापासून वेगळा आहे, त्याचे स्वरूप ओळखण्यासाठी आपण जीवाचा आटापिटा केला पाहिजे. आपण आपल्या आत्म्याला ओळखू शकलो तर आपल्याला मृत्यूचे भय अजिबात वाटणार नाही. ज्या षड्रिपूंनी आपल्याला गुलाम बनविले आहे, त्यांच्यावर जर आपण ताबा मिळवू शकलो तर आपण परमेश्वराच्या जवळ पोहोचलो, असे मानावयास हरकत नाही. त्यासाठी परमेश्वरावर पूर्ण श्रध्दा ठेवून निष्कामं भावनेने परमेश्वराचे अखंड नामस्मरण केले पाहिजे. कलियुगातील हे एक सर्वोत्तम साधन आहे.

आपला देह हा घोड्याच्या रथाप्रमाणे आहे. देह हा रथ आहे. व इंद्रिये ही रथाला जोडलेल्या घोड्याप्रमाणे आहेत. मन हे अश्वाला घातलेले लगाम आहेत. आणि आत्मा हा या रथाचा सारथी असून तो स्वतः शुध्द असून सुखदुःखाचा उपभोग घेतो. या आत्म्यास ओळखणारा ईश्वरास प्राप्त होतो. परमेश्वराचे प्रेम हे सदाचारी व कर्तव्यदक्ष लोकांना नेहमीच मिळते. भगवान श्रीकृष्ण भगवत्गीतेत सांगतात की, माणसाच्या अंगी दैवी गुण असतील तर तो ईश्वराप्रत पोहोचतो. अंतःकरण शुध्द झाले की सात्विक चित्तांत ईश्वरी ज्ञानाचा उदय आपोआप होईल.

# श्री समर्थ रामदासांचा व्यापक राष्ट्रधर्म

– श्री. रमेश पांडुरंग पुंडलिक
द्वारा श्री. काशीनाथ दारूणकर,
'तेलीखुंट,, डालमंडई रोड,
अहमदनगर.

थोर साक्षात्कारी संत रामदास स्वामींची दास नवमी भारतात मोठ्या प्रमाणावर आनंदाने साजरी केली जाते. समर्थ रामदास स्वामी हे केवळ संत नव्हते तर ते समाजशास्त्रज्ञ, थोर विचारवंत, राज्यमार्गदर्शक आणि प्रगत जीवनाचा भविष्यकालीन विचार करणारे द्रष्टे संत होते. केवळ दासनवमी श्रीसमर्थांच्या दासबोध पारायणाने साजरी करणे योग्य ठरणार नाही. समर्थांच्या दासबोधातील विचार व्यापक कसा आहे आणि आज त्याची आवश्यकता काय आहे हे समाजाला समजावून देण्याची गरज आहे. समर्थ रामदासस्वामी हे श्रीरामभक्त, ग्रंथकर्ते, उत्तम लढवय्ये आणि मानसशास्त्रज्ञ होते.

आज समाजात समर्थांनी सांगितलेला धर्म लोक विसरत आहेत. संतांच्या शब्दांचा विसर पडल्याने समाज अधोगतीला पोहोचण्याची शक्यता असते. संत हे समाजाचे, देशाचे खरेखुरे मार्गदर्शक आणि द्रष्टे पुरुष असतात. राष्ट्रीय एकात्मता वाढविण्याच्या दृष्टीने सध्या शासनाने त्यासंबंधी प्रचार योजना राबविल्या आहेत. विविध धर्म, जाती, पंथ, संस्कृती परस्परांपासून वेगळ्या असल्या तरी या देशाला राष्ट्रीय एकात्मता हा विचार अपरिचित नाही. कारण यापूर्वी अनेक कवी, लेखक, संत, शाहीर यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व ओळखले होते. त्यासंबंधी आपले मौलिक विचारही व्यक्त केले आहेत.

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनी राष्ट्रउभारणी, राष्ट्राची प्रगती आणि सुखी परिपूर्ण असे जगजीवन यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची किती आवश्यकता आहे हे वेळोवेळी सांगितले आहे. संतांप्रमाणे सहिष्णुता ईश्वरभक्ती समर्थांत असूनही समर्थ इतर संतांपेक्षा थोडे वेगळे होते. त्यांच्या वाङ्मयातून समाजाच्या विविध अंगांचे पोषण झाले आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीची समर्थांनी डोळसपणे पाहणी केली. निष्क्रिय, संवेदनाशून्य, धर्मशून्य, अज्ञानी आणि क्षात्रतेज गमावलेला समाज जणू काही अहिल्येप्रमाणे या चैतन्यमयी समर्थ स्पर्शाची वाट पहात होता. 'धीर धरा...धीर धरा... गडबडू नका' असे चैतन्यमय प्रेरणादायी आश्वासन देतच समर्थ आले. समाजाची अशी मृतवत अवस्था पाहून या सन्त हृदयाचे पाणी.. पाणी झाले. पण या स्नेह कारूण्याची ती भागीरथी झाली. समाजाला संजीवनी देणारी ती वाङ्मयगंगा या पवित्र गंगोत्रीमधून उगम पावून भगीरथाच्या साठ हजार पूर्वजांच्या उध्दारासाठी आवेगाने वाहणाऱ्या गंगेप्रमाणे रो... रो... करीत धावू लागली. समाज खडबडून जागा झाला. मराठमोळ्या जनतेतून मूर्तीमंत क्षात्रतेजाची समशेर हातात घेऊन उभे राहिले.

सध्या भारतात लोकशाही आहे. प्रत्येक नागरिक हा राज्यकर्ता आहे. त्याच्यापाशी राज्यकर्त्याप्रमाणे योग्यता असणे आवश्यक आहे. समर्थांनी राज्यकर्त्यांना केलेला उपदेश प्रत्येक नागरिकाला लागू होतो. ते म्हणतात '

'अमर्याद फितवेखोर। यांचा करावा संहार।
शोधला पाहिजे विचार। यथातथ्य॥

समाजात कोणकोण जातीद्वेष भडकवून प्रक्षुब्ध भाषणे देऊन लोकांमध्ये फूट पाडतात? कोण देशाच्या नावाखाली गैरव्यवहार करतात? या सर्व गोष्टींचा डोळसपणे शोध लावून त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. जातीभेदावरही समर्थांचे विचार अतिशय मौलिक आहेत.

नरशार्दूल संभाजी महाराज यांना लिहिलेले पत्र लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामधील संदेश अत्यंत व्यापक विचार आणि भविष्यकालीन परिस्थितीचा विचार दर्शविणारे आहेत. 'शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायांचा आठवावा प्रताप याच पत्रात अनेक गोष्टींचे विवेचन केलेले आहे.

समर्थांनी पदभ्रमण करून लोकजीवन जवळून पाहिले होते. मनुष्यस्वभाव परिस्थिती याचा अभ्यास करून त्या संबंधी सखोल चिंतन केले होते. समाजप्रक्षोभनाची कारणमीमांसा त्यांनी शोधून काढली. जाती, धर्माबद्दलचे अज्ञान ही दोन प्रमुख कारणे होती. संभाजी महाराजांना लिहिलेले पत्र लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामधील संदेश अत्यंत व्यापक आणि भविष्यकालीन परिस्थितीचा विचार दर्शविणारे आहे. 'शिवरायांचे आठवावे रूप। शिवरायांचा आठवावा प्रताप॥' अशा अनेक गोष्टींचे विवेचन, मार्गदर्शन या पत्रात दिले आहे.

समर्थांनी संपूर्ण भारतभर भ्रमण केले. तरूणांमध्ये बल, शक्ती निर्माण होण्यासाठी मारूतीचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून अत्यंत परिश्रम घेऊन प्रत्येक गावी मारूतीची स्थापना केली. भारतात कोठेही जा, तेथे मारूतीचे मंदिर दिसलेच पाहिजे. श्रीहनुमंताचे हे आदर्शभक्तीचे व शक्तीशाली व्यक्तिमत्व तरूणांच्या पुढे ठेविले.

ग्रामीण भागात व्यायाम शाळेत प्रत्येक ठिकाणी श्रीमारूतीची मूर्ती आहे. त्याच्यासमोर व्यायाम आणि प्रार्थना अपेक्षित आहेत. आज व्यायामाची पध्दत बदलत चालली असली तरी त्या त्या व्यायामाच्या वेळी श्री मारूतीची प्रार्थना केल्याने चैतन्याची भावना मनात निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही.

समर्थांना अभिप्रेत असलेला राजकारणाचा अर्थ काही विद्वान समजतात त्याप्रमाणे केवळ 'चातुर्यापुरताच मर्यादित नसून तो अधिक व्यापक अर्थाने त्यांनी गृहीत धरला होता. राजा आणि प्रजा यांचे संबंध, लोकसमाजाची स्थिती सुधारण्यासाठी कराव्या लागणाऱ्या चळवळी, लोकांचे पुढारी व त्यांच्या कर्तव्यांचे नियम, चार्तुवर्ण्य व्यवस्था व तिच्या रक्षणाचे उपाय, लोकसंग्रह ह्या सर्व गोष्टींचा समावेश समर्थांच्या राजकारणात होतो. अध्य.ात्माच्या पायावरच श्रीरामदास

स्वामींच्या जीवनकार्याची उभारणी झालेली असल्यामुळे राजकारणाचा विचार करतानाही ते परमार्थ दृष्टीआड होऊ देत नाही.

"मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें ते राजकारण॥"

किंवा दुसऱ्या एका ओवीत समर्थ म्हणतात—

"सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयांचे।
परंतु 'आधी भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे॥"

राजनीतिकुशल व साक्षात्कारी संत म्हणून समर्थांनी जसा लौकिक मिळवला त्याप्रमाणेच व्यवहारचतुर पुरूष म्हणूनही त्यांनी आपली अनन्य साधारण योग्यता सिध्द केली. अगदी सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यक्रमात उपयोगी पडेल असा कितीतरी विषयांच्या बाबतीत त्यांनी अधिकारवाणीने उपदेश केला आहे. त्यांचा "दासबोध" हा ग्रंथ सामान्यतः अध्यात्मपर ग्रंथ असला तरी प्रपंच व्यवहारांचेही त्यांनी अनेक समासातून मोठ्या मार्मिकपणे विवेचन केले आहे. प्रयत्न, बोध, प्रबोध, प्रचिती, श्रध्दा, वैराग्य, सत्त्व, रज, तम इत्यादी गुण, साधक, बध्द, मुमुक्ष, सद्गुरू, उत्तम पुरूष, मूर्खाची लक्षणे इ. अनेक विषयांवर त्यांनी मार्मिकपणे लिहिले आहे. म्हणून दासबोध हा ग्रंथ आध्यात्मिक ग्रंथाप्रमाणेच प्रापंचिकांचा व्यवहारकोशही बनला आहे. श्रीसमर्थांची मधुर वाणी आजही अनेकांना स्फूर्ती व प्रेरणा देत राहील.

# शिल्पकार साई

शिर्डी नावाचे आहे एक किमयागार
सत्याहून सुंदर साई शिल्पकार
भक्त भावनाची घडविली मूर्ती
साईनामाची होय चौफेर किर्ती
श्रध्दासबुरी त्यांची दोन कुंडले
श्रध्देच्या भक्ती भावनेला त्यांनी विस्तारले
प्रचितीने भक्ता त्यांनी रंगविले
सत्कर्माच्या सुमनांनी करावे पूजन
साई साई नामाचे श्रवणी गुंजन
उदि संजिवनी जागविते कृपा
आशीर्वाद त्याचा हृदयात जपा

**— सौ. वसुंधरा रामराव चोरे**
८०३ सी, लक्ष्मीभुवन
डॉ. आंबेडकर रोड, दादर,
मुंबई - ४०००१४.

# साईदरबारातील माणिक आणि मोती – ८
## बाळाजी पाटील नेवासकर

– सौ. विभावरी ज. राणे
४०३/४ अस्मितादर्शन, तेली गल्ली,
अंधेरी (पूर्व), मुंबई ६९.

बाळाजी पाटील नावाचे एक साईभक्त होते. ते नेहमी शिर्डीस गावात जाण्याचा व लेंडी बागेत फिरण्याचा बाबांचा रस्ता साफ झाडून स्वच्छ करीत असत. असा हा भाग्यवान पाटील संसार करून संतसेवा करीत असे.

बाळाजी नेवासकर यांच्या शेताची कापणी (कातरणी) झाली की ते सर्व धान्य साईबाबांच्या मशिदीत रचून ठेवीत. आणि या सर्व धान्याचे मालक साईबाबाच आहेत, असे ते म्हणत. त्या धान्यातून साईबाबा जेवढे धान्य स्वत:च्या हातांनी देतील तेवढेच धान्य बाळाजी पाटील घरी घेऊन जात असे. त्या दिलेल्या धान्यातच तो आपला उदरनिर्वाह करीत असे. महाराजांची आंघोळ झाली म्हणजे व हात-पाय-तोंड धुऊन मोरीतून जे सांडपाणी येत असे ते बाळाजी पिऊन राहात असे. बाळाजी नेवासकरने हयात असेपर्यंत नेहमीच अशी पद्धत चालू ठेवली होती. यांच्या पश्चात त्यांचा मुलगा सुध्दा आपल्या वडिलांप्रमाणेच साईबाबांची सेवा करीत असे व आपल्या शेतातील धान्य साईबाबांच्या मशिदीत आणून ठेवीत असे व त्या धान्यातील जोंधळ्याची भाकर साईबाबा देह ठेवितोपर्यंत दिवसातून चार वेळा खाण्यासाठी आणून देत असे.

एकदा बाळाजीच्या घरात एक शिरडीचा रहिवासी रघू पाटील पाहुणा म्हणून आला आणि या बाळाजी पाटील यांच्या घरी उतरला. बाळाजी पाटील यांच्या गोठ्यात संध्याकाळी गुरे बांधलेली होती आणि एक मोठा नाग फूं फूं करीत गोठ्यात आला. तो नाग फणा करून अगदी आरामात गोठ्यात बसला. नागाला पाहून सर्व माणसे भीतीने गांगरून गेली. काय करावे कोणालाच काही सुचेनाच. गोठ्यातील गुरे बाहेर जाण्यासाठी धडपडू लागली पण गोठ्यात नाग असतेवेळी गुरांना सोडण्यासाठी गोठ्यात कोण जाणार आणि जर गुरांना सोडले नाही तर गुरांचा पाय नागावर पडून काहीतरी विपरीत घडणार हे निश्चितच होते. पण या बाळाजीची सर्व निष्ठा आपल्या साईबाबांवरच होती. बाळाजीने लांबूनच नागाला पाहिले व तो आनंदाने अगदी बेहोष झाला व त्या नागाला साष्टांग नमस्कार केला आणि म्हणाला "साईनाथ मला नागाच्या रूपात भेटायला आले आहेत." त्याने त्याच्या पुढ्यात वाटीभर दूध ठेवले. पण या बाळाजीला मात्र अजिबात भीती वाटली नाही. उलट तो म्हणतो, "काय बाबा? आम्हाला भीती दाखवता काय? हे वाटीभर दूध घ्या आणि माझी भोळी-भाबडी सेवा मान्य करून घ्या" पण त्या वाटीभर दुधाने त्या नागाचे भागलेच नाही. म्हणून त्याने मोठे तपेलेभर पाणी आणले व पुढ्यात ठेवले पण नागराजाने अजिबात हालचाल केली

नाही. बाकी इतर सर्व माणसे भयभीत झाली होती. त्यांना वाटत होते की आता ह्या संकटातून आपला निभाव कसा लागणार आणि सर्व अगदी लक्ष्य ठेवून त्या नागाकडे बघत होते. एवढ्यात अचानक नाग सर्वांच्या नजरा चुकवून कोठे गेला काहीच समजले नाही. सर्व गोठा शोधला पण नागाचा ठावठिकाणा लागला नाही आणि सर्व माणसे अगदी आनंदित झाली पण बाळाजीला मात्र अतिशय वाईट वाटले. त्याल वाटत होते जसे नागरूपात साईबाबा गोठ्यात आले तसेच जातेवेळी मला दिसले असते तर मी अगदी धन्य झालो असतो.

या बाळाजी पाटलांच्या दोन स्त्रिया होत्या त्या दोघीही साईभक्तच होत्या. त्या दोघीही नेवाशावरून आपल्या लहान-लहान मुलांना बरोबर घेऊन साईबाबांच्या दर्शनाला शिरडीला येत असत. साईबाबा त्या दोघींनाही चोळी-लुगडी घेत असत व त्यांना प्रेमाने आशीर्वाद देत.

असा हा साईभक्त बाळाजी पाटील काही वर्षांनी स्वर्गवासी झाला. एकदा त्याचे वर्ष श्राध्द आले. जेवायला येणाऱ्या माणसांचा अंदाज करून जेवण तयार केले होते. पण जेवायला वाढतेवेळी त्यांच्या अंदाजापेक्षा तीन पटीने जास्त माणसे जेवायला आली. मग मात्र बाळाजी पाटील यांची सून मनातून अगदी घाबरून गेली. आणि आपल्या सासूबाईंना हलक्या आवाजात म्हणाली, "सासूबाई आपली आता फजिती होणार, ह्या एवढ्याशा जेवणात ही सर्व मंडळी जेवणार कशी" परंतु बाळाजी पाटील यांच्या पत्नीची साईबाबांवर अतिशय निष्ठा होती. तीं आपल्या सूनेस म्हणाली, "अग सूनबाई, तू कसली काळजी करतेस. आपले साईबाबा आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत" असे सांगून बाळाजीच्या पत्नीने मूठभर उदी घेतली आणि ती शिजलेल्या अन्नाच्या प्रत्येक टोपात घातली आणि जेवणाची भांडी सफेद कपड्यांनी झाकून ठेवली आणि आपल्या सूनेस निष्ठापूर्वक बजावले की "अग सूनबाई तू आता खुशाल वाढायला सुरवात कर. पण एक मात्र लक्षात ठेव की, टोपातील जेवण वाढण्यापुरताच कपडा बाजूला कर, वाढून झाल्यावर पुन्हा कपडा टोपावर नीट झाकून ठेव" "सूनबाई तुझ्या लक्षात कसे येत नाही आपली लाज, ते साईदेवच राखतील व आलेल्या माणसांना जेवण कमी पडले तर, त्याची काळजी त्या साईदेवानाच आहे.

बाळाच्या पत्नीची जशी निष्ठा होती तसाच सर्व चमत्कार झाला. जेवढी माणसे जेवायला आली होती ती सर्व जेवून अगदी तृप्त झालीं आणि तरी सुध्दा जेवण शिल्लकच होते. जसे पहिले भरलेले होते तसेच, इतका त्या उदीचा प्रभाव आहे, पण ज्याचा जसा भाव तसाच त्याला अनुभव येतो.

– मानव जेव्हा संचित ज्ञान व अनुभूत ज्ञान यांच्या समन्वयाने पूर्णपणे तृप्त झालेला असतो, तेव्हा तो स्वरुप साक्षात्कारात स्थिर झालेला आहे आणि तो योगी आहे असे म्हटले जाते.

# साईबाबांचा भक्तांना उपदेश

– श्री. दि. रे. बाबरेकर
बी.ए., एल. एल. बी. (हिन्दी साहित्य रत्न)
बी–३३४/३, सरकारी कर्मचारी वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.

साईबाबा त्यांच्या भक्तांच्या सर्व अडचणी स्वतःच जाणून घेऊन त्या सोडवीत असत, सोडवितात व सोडवीत राहणार, असा त्यांच्या सर्व भक्तांना संपूर्ण विश्वास आहे. साईबाबांच्या रसाळवाणीबद्दल व प्रेमळ स्वभावाबद्दल सर्वांना माहिती आहेच. ते स्वतःच सांगत असत की "संकटांचा आणि अडचणींचा सर्व बोजा माझ्यावर टाकून तुम्ही आपले नित्य कर्म करीत रहा." ईश्वर एकच आहे आणि वेगवेगळे धर्म हे त्या परमेश्वराकडे जाणारे अनेक मार्ग आहेत, अशी त्यांची दृढ भावना होती. बाबांनी सर्व धर्माबद्दलची समभावना बाळगून गुणी व लायक व्यक्तींना योग्य तो मार्ग दाखवून भक्तिमार्गाची शिकवण दिली.

साईबाबा आपल्या भक्तांना नेहमी सांगत असत, "तुम्ही फळाची अपेक्षा न बाळगता आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी मनापासून झटावे. फळाचे बाबतीत देवाला जे काही करावयाचे असेल ते देव करील." संकटांना व अडचणींना घाबरून आत्महत्या करणे केवळ भ्याडपणाचे लक्षण नाही तर तसे करणे पाप करण्यासारखे आहे. प्राण त्याग केल्याने कर्मभोग संपत नाही. पुन्हा जन्म मिळाल्यावर पूर्वीचा कर्म भोग भोगणे भाग असते. शिवाय त्यात आत्महत्येच्या पापामुळे आणखीनच वाढ झालेली असते. संकटाचे वेळी मनोयोग ही साधनाही उपयोगी ठरते. त्याद्वारे मानसिक दृष्ट्या देवाशी आपला संबंध बांधलेला असतो. सुंदर अशा मानव जन्मात आपल्या देहात सुंदर मन ही असणे आवश्यक आहे. साईबाबांचे "श्रध्दा आणि सबुरी" अंगी कायम स्वरूपात बाणविल तर आत्मज्ञान, आत्मशक्ती व निरंतर सुख प्राप्त होऊ शकते. आत्मज्ञान म्हणजे काय? यासंबंधी विचार करता असे की मी कोण आहे? माझी कर्तव्ये काय आहेत? समाज आणि देशाकरिता मला वेळ व काळानुरूप कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे? यासंबंधी स्वतःला प्रश्न विचारून त्यासंबंधीची जाणीव करून घेऊन आपली सर्व कर्तव्ये पार पाडण्यास झटत रहावे. सध्याच्या काळात वरीलप्रमाणे जाणीव करून घेण्यास कुणी तयार नाही. केवळ हाती असलेला अधिकार व सत्तेचा वापर स्वतःच्या स्वार्थाकरिता करत राहणे, असे अधिकांश व्यक्तींचे धोरण बनत असल्याचे आढळून येते.

आत्मज्ञान म्हणजे व्यक्तीने अगोदर स्वतःची जाणीव करून घेणे म्हणजेच देहात वसत असलेल्या 'आत्म्या'शी एकरूप होवून त्याची जाणीव करून घेणे. ह्या जगात आत्मा जे जीवन जगतो ते पूर्वकर्मानुसार सुखी किंवा दुःखी असू शकते. शांती, अत्यानंद, ज्ञान, प्रेम, शूचिर्भूतता, सामर्थ्य हे आत्म्यावर झालेले मूळ संस्कार. ज्यावेळी

आत्मा, काम, क्रोध, आसक्ती, लोभ व अहंकार यांचा गुलाम बनतो त्यावेळी त्याच्यावरील असलेले मूळ संस्कार नष्ट होतात. मनःशांती ही आत्म्याचा स्वतःचा एक गुणधर्म आहे. एकदा का आत्म्याच्या जाणिवेची स्थिती प्राप्त झाली की, परम शांती आतून आपोआप मिळत असते. मन, बुद्धी व संस्कार ह्या आत्म्याच्या तीन शक्ती होत. आत्मा कधीच विनाश पावत नाही. तो शाश्वत आहे.

आता आत्मशक्ती म्हणजे काय व ती कशा रीतीने प्राप्त होऊ शकते या संबंधी विचार करू. आत्मशक्ती म्हणजे आपल्या आत्म्यात आलेली शक्ती. व्यक्ती सुखी व आनंदी असेल तर त्याचा आत्माही सुखी व आनंदी असतो. आपल्या आत्म्यास सुखी व आनंदी ठेवण्याकरिता व्यक्तीने संकटात व अडचणीत देखील आनंदी राहण्याचा म्हणजे श्रध्दा व सबुरी बाणविण्याचा प्रयत्न करावा. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' याचा व आपल्यापेक्षा अधिक दुःखी लोकांबद्दलचा विचार ठेवून आपण फार सुखी आहोत अशी मनाची समजूत करीत रहावी. आत्मा जर दुःखी अगर कष्टी असेल तर त्यात स्थिरता निर्माण होणार नाही व त्यामुळे त्यात शक्ती निर्माण होऊ शकणार नाही व व्यक्तीमध्ये आत्मशक्तीची उणीव भासेल आणि आत्मशक्ती तर अति आवश्यक बाब आहे. आत्मशक्ती कायम टिकविण्यासाठी अगर वाढविण्यासाठी ईश्वर भक्ती करावी तसेच आपल्या कार्यात विशेष लक्ष घालून त्यात गढून जावे. आत्मशक्तीचा संबंध मन म्हणजे चित्त याशी आहे. मन चंचल अगर अस्थिर असेल तर बेचैन अवस्था राहील व आत्मशक्ती निर्माण होण्यास अडथळे निर्माण होतील. त्या करिता ईश्वरावर दृढ श्रध्दा व आपल्या कार्यक्षमतेबद्दल आत्मविश्वास बाळगणे आवश्यक आहे. तसेच मनाची एकाग्रता निर्माण करणे ही आवश्यक आहे. अशी एकाग्रता स्मृतीची सुधारणा व तिचा विकास करून प्राप्त करता यईल. मोठ्या प्रमाणावर एकाग्रता प्राप्त करण्याकरिता ईश्वरभक्ती किंवा ध्यान मार्गांचे अनुसरण करावे.

आत्मज्ञान व आत्मशक्ती प्राप्त झाली म्हणजे सुख आपोआप प्राप्त होते. सुख हे बाहेरच्या जगात शोधून सापडत नसते. मनाची, हृदयाची व आत्म्याची अशी परिपक्व अवस्था निर्माण होते की त्यामुळे आपण प्रत्येक क्षणी सुखाचाच अनुभव घेत आहोत असे वाटते. सुखाचा संबंध समाधानात व मानून घेण्याशी जास्त असतो. अनेक संकटे व अडचणी तसेच दुःखे मानवाने स्वतःच्या चुकीमुळे, गैरसमजुतीमुळे, अंधश्रध्देमुळे व काल्पनिक अपेक्षा व आकांक्षाद्वारे निर्माण केलेली असतात व त्यासंबंधी मानवाला जेव्हा खरे ज्ञान प्राप्त होते किंवा अनुभव येतो त्यावेळी अशा संकटांचा व दुःखांचा विसर पडत जातो.

# कोकणचे प. पू. सद्‌गुरू राऊळ महाराज

– सौ. विभावरी ज. राणे
अस्मिता दर्शन ४०३/४,
तेली गल्ली, अंधेरी (पूर्व) ६९.



आपल्या महाराष्ट्र प्रदेशांत अनेक संतरत्ने जन्माला आली आहेत. त्यातील प.पू. राऊळ महाराज यांच्याविषयी मी थोडक्यात परिचय करून देत आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळपासून जवळच असलेल्या पिंगोळीचे राऊळ महाराज हे अवतारी पुरुष होऊन गेले. त्यांचे भक्तीकार्य, वाटचाल, एकंदरीत वागणूक सारे काही विलक्षणच. कुडाळ तालुक्यात पिंगुळी हा गाव सुखसंपन्न असा आहे. विशेष म्हणजे पिंगळी किंवा गोंधळी लोकांच्या कळसूत्री बाहुली, यासारख्या अनेक खेळांविषयी आणि लोकनाट्य या कलेविषयी पिंगुळी गावाची पुरातन कालापासून प्रसिध्दी आहे. आता त्या परिसरात मोठमाठे उद्योगधंदे उदयास येत आहेत त्यामुळे दिवसेंदिवस जास्तच महत्त्व वाढत आले आहे. याच भूमीत "राजयोगी" या थोर संज्ञेला पात्र ठरलेले महान सत्पुरुष श्री समर्थ राऊळ महाराज यांचा जन्म झाला.

आप्पा गोपाळ राऊळ नावाच्या एका शेतकरी कुटुंबात महाराजांचा जन्म झाला महाराजांचे नाव श्रीकृष्ण असे होते. भावंडात ते थोर असल्यामुळे त्यांना सर्व आबा म्हणत. ते शेतात काम करतेवेळी सुध्दा श्री संत सावता माळ्यासारखे अभंग गात असत. त्यांचे बालपण निसर्गतःच संतवाणीत रमले होते. आबा यांचे शालेय शिक्षण फक्त मराठी तिसरीपर्यंत झाले. पण आश्चर्य हे की तेवढ्याच शिक्षणावर त्यांनी

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास अशा अनेक संतांचे अभंग पाठ केले होते. त्यांचे मन सतवांणीच्या रसात भरून गेले होते.

आबा जसे पंधरा-सोळा वर्षांचे झाले तरी त्यांच्या विचारात आणि कृतीत झपाट्याने बदल होत गेला. त्यांच्या ज्ञानाची वलये क्षितिजे विस्तृत होऊ लागली आणि त्यांच्या अभंग गायनाला दिवसेंदिवस चांगलीच प्रगती होऊ लागली. "ध्यानी मनी पांडुरंग" अशी त्यांची अवस्था झाली पण त्यांच्या घरातील मंडळी त्यांच्या भक्तीला काडीचीही किंमत देत नसल्याने संत श्रेष्ठ तुकोबांसारखी त्यांची दशा झाली. गावातील, आजूबाजूची त्यांची मित्रमंडळी सुध्दा त्यांच्या गायनाची टिंगलच करीत असत. नराचा नारायण होण्याची गुरूकिल्ली म्हणजेच नामस्मरण. याचे त्यांना व्यसनच लागले होते. जसा प्रल्हादास नारायण, मीरेला कृष्ण प्रिय होता तसा आबा बुवा पांडुरंगाचा वेडा झाला होता. घरातील वडिलधाऱ्या मंडळींनी आबाच्या भजनाला थांबवण्यासाठी खूप प्रयत्न केले पण आबांचे भजन चालू असायचे.

आबा सतरा-अठरा वर्षांचे झाले. त्यावेळी सर्व भावंडात मोठे असल्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्याना नोकरी धंद्याला मुंबईत पाठविले. कारण तिथे गेल्यावर तरी ते सुधारतील अशी त्यांच्या वडिलांची कल्पना होती. मुंबईत गेल्यावर थोड्याच दिवसात चिराबाजार येथे हातमोजे, टोप्या वगैरे बनविण्याच्या लहानशा कारखान्यात ते सर्व प्रथम कामाला लागले. आबाची राहण्याची टापटीप पध्दत, प्रामाणिकपणा, कामाची चिकाटी अशा अनेक गुणांमुळे ते लवकरच लोकप्रिय झाले. ते जिथे राहात होते त्या मालक मंडळींचा कंठमणीच झाले. संत कबीर जसा मागावर बसून शेले विणीत असता रामनामाचा घोष करीत असे तसे आबा बुवा कारखान्यात काम करीत असता अभंग गात असे. त्यांच्या कंपनीच्या मालकाने आपल्या ओळखीने त्यांना "टाइम्स ऑफ इंडिया" छापखान्यात नोकरीला लावले. आबा उपजतच तरतरीत आणि चतुर असल्यामुळे छापखान्यात त्यांच्यावर नेमलेल्या खात्यात ते लवकरच तरबेज झाले. तो काळ असा होता की आपला भारत देश पूर्ण पारतंत्र्यात होता. त्यामुळे छापखान्यात सर्व वरिष्ठ मंडळी इंग्लिश आणि परप्रांतीय होती. अशा मिश्र वातावरणात आबा बुवाने आपला मराठी बाणा मुळीच सोडला नाही. आबाने वरिष्ठांचा दबाव कधीच सहन केला नाही. छापखान्यात सुध्दा त्यांच्या अभंगांचा तोफखाना सुरूच होता. त्यामुळे वेळोवेळी आबाला दमदाटी देण्याचे सत्रच सुरू केले. काही मंडळी तर टिंगलच करीत असत.

पण आबा काय दोन पैशांसाठी दारोदार गात फिरणाऱ्या भिकाऱ्यांसारखा गायक नव्हता. सतत नामस्मरणाने त्यांचा आत्मा परमेश्वराशी एकरूप झाला होता. त्याने छापखान्यात चालविलेले गाण्याचे सत्र पाहून त्यांचा वरिष्ठ साहेब त्यांच्यावर फारच संतापला व म्हणाला की, "काय रोज गाते तू?" त्यावर आबाने त्याला ताडकन् उत्तर दिले की, साहेब तुम्ही आमच्या मराठी भाषेचा अभ्यास करा. म्हणजे मी रोज का ओरडतो हे समजेल आपणाला. "कमल मुख हरिभजन को दिया" पण आबांचे हे

कबीराचे तत्वज्ञान ऐकतो कोण? एके दिवशी छापखान्यात आबा बुवाची समाधी लागली की विचारूच नका. कामधंदा बंद करून अभंगाची जणू बरसात सुरू केली. आधीच वरिष्ठसाहेब त्यांच्यावर नाराज व संतापलेले होते. ते आबाला दरडावून म्हणाले की तू रोज असा कामधंदा बंद करून गात बसणार तर उद्यापासून कामावर येऊ नकोस.

आबाला नोकरीची नि कामधंद्याची पर्वाच कुठे होती? ते मागचा पुढचा विचार न करता एकदम उद्‌गारले की "माझे भजन बंद केलेस? तुमचा कुत्रा मरेल"! आणि खरोखरच योगायोग असा की आबाचे ते बोल खरे ठरले. साहेबांचा त्यांच्या प्राणाहून प्रिय असलेला कुत्रा अवघ्या सहा तासात जागच्या जागी ठार झाला. तिथून अखंड छापखान्यातील मंडळी थरथर कापत असत. वरिष्ठसाहेब तर आबांचे दासच झाले होते.

आबांच्या वयाने पंचविशी गाठली होती. त्यांच्या वडिलांच्या मनात असा विचार आला की त्याला प्रपंचात लोटल्यावर तरी त्यांचे भजनी चाळे बंद होतील म्हणूनच त्यांनी योग्य मुलगी पाहून स्वारीला गावी बोलावून घेतले. आणि मोठ्या थाटात आबांना चतुर्भुज करून प्रपंचात लोटले. आबा बुवांनी मुंबईत बिऱ्हाड थाटून तुकोबासारखा प्रपंच आणि परमार्थ यांची सुंदर जुगलबंदी सुरू केली. आजूबाजूच्या चाळीत जर कोणी स्वर्गस्थ झालाच तर त्या दिवशी बुवांच्या भजनाला फार जोर चढत असे. अशा भयानक आणि महाघोर प्रसंगी बुवांची पत्नी राधाबाई हिला तुकोबांच्या जिजाईसारखे समाजाला तोंड द्यावे लागत असे. तो पंढरीचा पांडुरंग आबा बुवांच्या हृदयात कायमचा ठाण मांडून बसला होता. तो काय थोडाच लोकांच्या टीकेला घाबरून पळ काढणार!

सोलापूरचे आत्मज्ञानी योगी सत्पुरुष श्री बाळकृष्ण महाराज नेहमी मुंबईला येत व त्यांचे वास्तव्य माधवबाग येथे असायचे. आबा बुवांना पण सद्‌गुरूंची फार आवश्यकता होती. जरी थोर सिध्दी प्राप्त झालेली होती तरी—

"जयासी वाटे देव पहावा। त्याने सद्‌गुरू करावा"

हे राजगुरू रामदास यांचे वचन त्यांच्या नजरेसमोर होतेच. म्हणूनच आबाबुवा कामावरून सुटले की जिथे जिथे बाळकृष्ण महाराजांची कथा, कीर्तने असत तिथे धाव घेत. असे होता होता महाराजांची आबा बुवांवर फारच मर्जी बसली. आबा बुवांनी पण गुरूंची थोर सेवा केली. आबा बुवा जणू महाराजांचे कंठमणीच झाले.नंतर त्यांनी प्रिय भक्ताला आपल्याबरोबर कायमचाच सोलापूरला नेऊन तिथे सुंदर मठ बांधून देण्याचे नक्की केले. श्री गुरूंच्या वचनाला आबांनी पण पूर्ण मान्यता दिली. ही बातमी आबा बुवांच्या आईला समजली. आपला मुलगा नोकरी धंदा सोडून संन्यासी होवू पहात आहे, हे ऐकून तिचे हृदय वितळले. प्रभू रामचंद्र वनवासाला जाते समयी जी दारूण अवस्था कौसल्या मातेची झाली होती तशीच केविलवाणी अवस्था आबांच्या मातोश्रींची झाली. तिने आबांना समजून सांगितले की तू असा संन्यासी बनून संसार व

नोकरीचा त्याग करू नकोस. सुखाने संसार करून भक्ती कर. गुरुसेवा कर. नंतर ती श्री बाळकृष्ण महाराजांना भेटली व सर्व व्यथा त्यांना सांगून नंतर महाराजांनी आबांची समजूत घातली व आपला निर्णय मागे घेतला.

नंतर आबा बुवांनी आपले बिऱ्हाड गावी पाठविले व खोलीवर आपण एकटेच राहिले. अशावेळी एके दिवशी त्यांना एकाएकी वडील वारल्याची तार आली. तार वाचून त्यांनी पुंडलिक वरदा हरि विठ्ठल! अशी जोरदार आरोळी ठोकली व भजनाला सुरुवात केली. त्या दिवशी रात्रभर त्यांनी पूर्ण जागर केला व सकाळी स्वारी जी मौनावस्थेत दाराला कडी लावून ध्यानस्त बसली, ती पूर्ण चार दिवस बोहरच आली नाही. नंतर चाळीतील मंडळींनी दरवाजा फोडून पाहिले तर बुवा हात जोडून ध्यानस्थ बसलेले पाहून त्यांना आश्चर्य वाटले. लोकांची गर्दी पाहून पुन्हा भजन सुरू झाले.

वडिलांचा श्राध्द विधी करावा असे महाराजांच्या मनात आले व ते थेट गोदातीरी गेले. तिथे पिंडदान विधी आटोपून पुन्हा ते घाईघाईने मुंबईकडे येत असता त्यांना वाटेत एक दहा रूपयाची नोट सापडली. त्या पैशातून त्यांनी ताबडतोब एक मृदंग खरेदी केला. मृदंगाच्या जोरदार आवाजाने आणि भगवंताच्या नाम घोषाने सारा परिसर दणाणून सोडला.

वैराग्य बाणले, असे ज्याच्या देही। तोचि नृत्य पाही, भक्ति सुख।।

दिवसेंदिवस आबा बुवांचा कल वैराग्याकडे वाटचाल करू लागला. त्यांनी छापखान्यात जी अनेक वर्षे नोकरी केली तिच्यावर एकाएकी तुलसीपत्र ठेवून राजीनामा दिला. आपल्या पहाडी आणि प्रभावी अभंग गायनाने बुवांनी अनक वर्षे छापखाना म्हणजे "पंढरी" बनविली होती. नंतर सर्व कामगार बंधूंनी बुवांचा सत्कार आरंभिला. अशा समयी बुवांनी मोठी धमालच उडवून दिली. भजनाने सभेला सुरुवात केली. व जो काही राहिलेला पगार, फंड मिळाला होता तो त्या सभेतच सर्वांना वाटून बुवा मोकळे झाले. तिथून त्यांनी पैशाला आपल्या विशाल जीवनात केव्हाच थारा दिला नाही. कारण त्याग हाच संत जीवनाचा गाभा होय.

नंतर महाराज विचित्र वागू लागले महाराजांनी नोकरी सोडल्यानंतर तिर्थाटनांचे सत्र सुरू केले. अनेक वेळा पंढरपूरच्या वाऱ्या केल्या. एकदा कोल्हापूरला गाडीतून उतरल्यावर त्यांनी मृदंग गळ्यात घालून पदयात्रा सुरू केली. ठिक ठकाणी थांबत थांबत चार-सहा दिवसांनी पिंगुळी गाठली. घरी गेल्यावर बाहेर अंगणात बसून भजन सुरू केले. वडील वारल्यानंतर पहिलेच ते आपल्या आईला भेटण्यासाठी आले होते. आईची वैधव्य दशा पाहून त्यांना फार दुःख झाले. महाराजांच्या विचित्र वागणुकीमुळे गावातील लोक त्यांना खुळ बुवा म्हणू लागले. शिव्या देणे, तर घटकेत भजन करणे अशा त्यांच्या विक्षिप्त वागणुकीमुळे त्यांना खरोखरच वेड लागले असावे असा सर्व मंडळींचा समज झाला. घरात सर्व मंडळींबरोबर भोजनास बसले असता सर्व मंडळी जेवून उठली तरी त्यांचे पाटावर बसून भजन सुरूच असायचे. एकदा अशी गंमत

बुवांनी केली की खटारा गाडीच्या बैलाच्या गळ्यातील चाळ त्यांनी आपल्या गळ्यात घातले व भजन करीत वालावलहून थेट कुडाळ पावशी गाठली.

माया मोह ज्याने जाळीले ज्ञानाने। खंबीर वृत्ती, तोचि झाला.

एकदा अशीच दुःखद घटना घडली की सुमारे वीस वर्षे वयाचा मधुकर नावाचा मुलगा घरी वारला. त्या दिवशी महाराज मु. पाट येथे आपल्या एका भक्ताच्या घरी होते. तेव्हा मु. पिंगुळीहून खास माणूस पाठवून बाबांना ही दुःखद वार्ता कळविण्यात आली. ते दुसऱ्या दिवशी स्मशानात भजन करीत बसले. त्यांची धर्मपत्नी राधाबाई वारली तेव्हासुध्दा ते स्मशानात भजन करीतच बसले होते. महाराजांच्या त्यागाबद्दल आणि काही विचित्र वागणुकीबद्दल खरोखर आश्चर्य वाटते. आम्हा सामान्य जनाला संपत्तीचा केवढा मोह. त्यांना त्यांचे भक्त शेकडो रूपये देत पण श्री बाबा ते पैसे दुसऱ्या भक्ताला देऊन टाकीत. कोणाचे पेन घेत, कोणाची टोपी घेत तर कोणाचे घड्याळ, कोणाचा चष्मा. मात्र दुसऱ्याजवळून घेतलेली वस्तू बाबा एक दिवस सुध्दा आपल्याजवळ ठेवीत नसत. कारण त्यांना स्वतःचा संसार करायला दुसऱ्यांच्या खिशात हात घालण्याचे कारणच नव्हते. त्यांच्या घरी लक्ष्मी, सदा-सर्वकाळ आनंदाने नांदत होती. त्यांना भक्तीभावाने जे कोणी शरण येतात, नमस्कार करतात त्यांना ते कोणाला दासबोध, तर कोणाला शिवलीलामृत, कोणास गीता, तर कोणाला ज्ञानेश्वरी वाचण्याचा हुकूमच करायचे. त्यांची बसण्याची बैठक आणि शरीराच्या हालचाली अक्कलकोट स्वामी सारख्या वाटतात व अवखळवृत्ती पू. साटम महाराजांचे प्रतीक वाटायचे.

नामदेवाच्या काळात जनीवर नास्तिकांनी चोरीचा आळ घातला. मग राऊळ महाराज तरी कसे सुटणार. एकदा एका प्रसिध्द दत्त मंदिरात पूजेला लावलेल्या सोन्याच्या पादुका श्री राऊळ महाराज मंदिरात येऊन गेल्यावर चोरीला गेल्याचा खोटा कांगावा करून त्यानुसार, कुडाळ पोलीसांकडे महाराजांच्या नावे तक्रार नोंदविली. पण महाराजांचा त्या पादुकांशी काहीच संबंध नव्हता. दोन तोळ्याच्या पादुका चोरून त्यांना कुठे संसार करायचा होता? शिवाय रत्नागिरीतील सर्व पोलीस खाते श्री बाबांना ओळखत होते. बाबांच्या नावे तक्रार असताना सुध्दा त्यांना विचारण्याचे धाडस पोलीसांनी केले नाही. उलट त्यांनी त्या आरोप करणाऱ्या पुजाऱ्यांना खडसावून विचारले व सांगितले,तुम्हा मंडळीतर्फेच पादुका नाहिशा झाल्या आहेत. त्या सहा तासात हजर करा, नाहीपेक्षा सर्व पुजारी मंडळीवर कायदेशीर कारवाई केली जाईल. आणि काय विचारता, सर्व पुजारी घाबरून गेले पाचसहा तासांच्या आत व्यवस्थापकांनी बाजूच्या मंदिरात पादुका सापडल्याचे जाहीर केले. व लगेच पोलीस खात्याला कळविले

महाराजांना स्वामी गगनगिरी महाराज, श्री भालचंद्र महाराज यांच्याबद्दल थोर आदरभाव होता. भालचंद्र महाराज अचल असल्यामुळे आपल्या समवेत गाडीतून अखंड तीर्थांच्या ठिकाणी श्री राऊळबाबा फिरवून त्यांचे अलौकिक दर्शन भाविकांस

घडवीत असत. त्यांच्यात एकमेकात थोर आदरभाव आणि गाढ ममता होती. मुंबईत श्री भालचंद्र बाबांचे देहावसान झाले तेव्हा श्री राऊळ महाराज पिंगुळीला होते. त्यांनी जाणले की भक्तीपंथातील आपला एक सोबती या जगात आपला पवित्र देह ठेवून त्यांचा आत्मा चराचरात विलीन झाला. ती वेळ रात्रीची होती. अशा समयी बाबा उद्‌गारले की "अरे भालग्यान फसवल्यान" व खोलीचे दार लावून गप्प बसले. त्यावेळी त्यांच्या बोलण्याचा अर्थ कोणालाच समजला नाही. परंतु सकाळी जेव्हा जिकडे तिकडे तारा आल्या, त्यावेळी सर्वांना माहीत झाले की, श्री भालचंद्र महाराजांनी देह ठेवला. नंतर त्यांच्या समाधी सोहळ्यास श्री राऊळ महाराज हजर होते. एवढे गाढ प्रेम त्या दोन महात्म्यांत होते.

गोवा, बळगाव, कोकण आदी भागात 'दत्त अवतार' म्हणून समजले जाणारे प.पू. राऊळ महाराज यांचे गुरूवार दि. ३१-१-८५ रोजी मुंबईत महा नर्वाण झाले. त्यांचा पार्थिव देह शुक्रवारी १ फेब्रुवारी रोजी खास गाडीने पिंगुळीला आणण्यात आला व शनिवारी दि. २.२.८५ रोजी सकाळी १० वाजता अभंग, टाळ यांच्या जयघोषात व वाद्यांच्या गजरात त्यांना समाधिस्त करण्यात आले. दरवर्षी माघ शुध्द दशमी बाबांची पुण्यतिथी, दत्तजयंती, गुरूपौर्णिमा वगैरे उत्सव मोठ्या थाटात साजरे केले जातात. व त्या दिवशी महाराष्ट्रातून हजारोंनी त्यांचे भक्त तीर्थप्रसादाचा लाभ घेतात. त्या महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन हा लेख पूर्ण करते.

## लेखक - कवींस निवेदन

**'श्री साईलीला' मासिकाकरिता साहित्य पाठविताना लेखक - कवींनी पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

*** अंतर्देशीय पत्रावर, पोस्टकार्डवर लेखन करू नये.**

***आमच्याकडे आलेल्या कवितांचे प्रमाण खूपच असल्याने, पुढील सूचना मिळेपर्यंत, कृपया, कविता पाठवू नयेत्.**

*** सुवाच्च अक्षरात, कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून, दोन ओळींच्या मध्ये पुरेशी मोकळी जागा ठेवून लिखाण असावे, ते पाठपोठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे, लेखनासाठी वापरात येणारा कागद जीर्ण-विजीर्ण, टाकाऊ असू नये.**

*** हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

*** अभ्यासपूर्ण, तर्कशुध्द, मीमांसक व वैचारिक स्वरूपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**— का. सं.**

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**— साईनंद**

मंगळवार, दिनांक ६ फेब्रुवारी १९१२.

मी सकाळी उठलो आणि काकडआरतीस हजर राहिलो. माधवराव देशपांडे यांनी सांगितले की मला आज घरी परत जाण्यास परवानगी मिळेल. म्हणून मी, ते व बामणगांवकर यांचेबरोबर साईसाहेबांकडे सकाळी ७-३० वाजता गेलो. साईसाहेबांनी दुपारनंतर पुन्हा या असे आम्हास सांगितले. म्हणून आम्ही परतलो, व मी पुन्हा नित्याच्या दैनंदिन कार्यास लागलो. मी उपासनी व बापूसाहेब जोग यांनी पंचदशीचे वाचन केले. साईमहाराजांना ते बाहेर जाताना आम्ही पाहिले आणि दुपारच्या आरतीला हजर राहिलो. ब्रम्हानंद बाईने तिथे एक आरती व काही पदे गायिली. बापूसाहेब जोगांना आज आपले सेवानिवृत्ती वेतन आणण्यासाठी कोपरगावला जावयाचे होते म्हणून आरती लवकर संपली. दुपारच्या भोजनानंतर मी व बामणगांवकर मशिदीत गेलो. तिथे काकासाहेब दिक्षित होते. साईसाहेब म्हणाले की, आम्ही उद्या जाऊ शकतो. माधवराव देशपांडेही तिथे आले. साईसाहेब म्हणाले की आम्ही बऱ्याच दीर्घकाळापासून रात्रंदिवस विचार करीत आहोत. सर्वच तिथे चोर होते परंतु आम्हाला त्यांचेशी सामना द्यावयाचा होता. ते म्हणाले की, त्यांनी ईश्वराची दिवस-रात्र प्रार्थना केली की त्यांच्यामध्ये काहीतरी सुधारणा व्हावी किंवा ते निघून तरी जावेत. परंतु देवाकडूनच विलंब होत आहे.तसेच खुल्लम खुल्ला व्यवहाराला व विनंती प्रार्थनेचा ते स्वीकारच करीत नाहीत. आपण एक किंवा दोन म हनेपर्यंत वाट पहाणार व नंतर पाहू. परंतु जिवंतपणी किंवा मृत असताना ते आपली प्रार्थना ज्यासाठी करणार ते करणारच. ते तेली किंवा वाणी यांच्याजवळ जाणार नाहीत किंवा त्यांचेकडून यापुढे कधीही भिक्षा मागून आणणार नाहीत. लोक चांगले नाहीत आणि भक्तीभावपण नाही. मनानेही ते अस्थिर असेच आहेत. ते पुढे आणखीन म्हणाले, काही मित्रमंडळी एकत्रित होतील, दैविक ज्ञानाच्या चर्चा गोष्टी करतील, बैठका घालून ध्यानाला लागतील. त्यांनी काही हजारो रूपयांचा उल्लेख केला खरा पण कोणत्या संदर्भात हे सारे त्यांनी काही म्हटले याचे मला स्मरण नाही. मी नंतर परतलो आणि आम्ही दिक्षितांच्याकडून रामायण पुराणाचे पाठ ऐकले. नंतर आम्ही ते जेव्हा रपेटीस बाहेर पडले तेव्हा त्यांच्या पुन्हा दर्शनास गेलो. त्यांची मुद्रा प्रसन्न होती. श्री. राजाराम पंत दिक्षित आज खांडव्यास गेले. उपासनी शास्त्रींच्या पत्नीचे देहावसान झाले. ही दुःखद बातमी आज पत्राने समजली. मी, दिक्षित व माधवराव यांचेबरोबर उपासनींच्याकडे गेलो. त्यांचे सांत्वन केले व त्यांना वाड्यात आणले. असे समजल की फकीरबाबांनी साईबाबांजवळ माझ्या जाण्याच्या बाबतीत विचारणा केली तेव्हा सांईबाबा म्हणाले की मी खापर्डे यांना उद्या जावे असे सांगितले आहे असे उत्तर दिले. माझ्या पत्नीने जेव्हा माझ्या जाण्याच्या बाबतीत त्यांना विचारले तेव्हा साईबाबा



म्हणाले, मी व्यक्तिगत स्वीकृती दिलेली नाही म्हणून ते काही एक बोलणार नाहीत. नंतर मी लगेच तिकडे गेलो, तेव्हा साईबाबा म्हणाले, मी दादा भाटे यांचेकडून पाचशे रुपये आणि दुसऱ्या कुणाकडून तरी दोनशे रुपये घेऊन ते त्या सर्वांना तू दिल्याशिवाय तुला येथून जाताच येणे शक्य होणार नाही. रात्री वाड्यातील आरती काहीशी उशीराच झाली. कारण बापूसाहेब जोगांना कोपरगावाहून येण्यास उशीर झाला होता. ब्रम्हानंदी बाई व शिवानंद शास्त्री यांनी भजने म्हटली, भीष्मानेही भजन केले.

बुधवार, दिनांक ७-२-१९१२

सकाळी मी लौकर उठलो. प्रार्थना केली व नित्याप्रमाणे पंचदशीचा पाठवर्ग आयोजित केला. मी साई महाराजांजवळ परवानगी मागण्यासाठी गेलो नाही. आम्ही ते बाहेर जात असतानाचे वेळी त्यांचे दर्शन घेतले व ते परत आल्यावर मी मशिदीत गेलो. साई महाराज मशिदीत बसले होते व त्यांच्यासमोर एक व्यक्ती माकडाला शिकवलेल्या करामतींचे प्रदर्शन करत होती असे मी पाहिले. तिथे एक धंदेवाईक गायक व नृत्यांगना पण आली होती. तिचा आवाज मधुर होता व तिने काही धार्मिक गीते म्हटली. नंतर ब्रम्हानंदी बाई तिची सहचारी साळूबाई व शिवानंद शास्त्री आले. त्यांनी पूजा केली व ब्रम्हानंदीबाई, जिला लोक माईसाहेब म्हणून हाक मारीत असत तिनेही फार मधुर आवाजात गाणी म्हटली. साईसाहेबांनी सिंहासन इत्यादी इत्यादी आणण्यासंबंधीचे आदेश दिले आणि जेव्हा सारे काही स्थिरस्थावर झाले तेव्हा आम्ही मंडळी आपापल्या जागेवरच उठून उभे राहिलो. माईसाहेबांनी पुन्हा मधुर आवाजात दाने गाणी म्हटली ती ऐकून आम्ही तर मंत्रमुग्धच झालो. मला वाटते की ती साईसाहेबांना सुध्दा आवडली. नंतर आम्ही नित्याप्रमाणे आरती केली व दुपारच्या भोजनासाठी परतलो. माईसाहेब व तिच्या बरोबरच्या मंडळींनी माझ्या निवासीच भोजन केले. भोजनानंतर बामणगावकर आणि माईसाहेब आपल्या साथींच्या बरोबर साईसाहेबांजवळ परत जाण्याची परवानगी मागण्यासाठी गेले. माईसाहेब व साळूबाई यांना परवानगी मिळाली व बैलगाडीतून ती गेली. शिवानंदशास्त्री व बामणगावकर यांना साईमहाराजांनी थांबविल्यामुळे ते थांबले. मी लवंडलो आणि मला चांगली गाढ झोप लागली. नंतर दिक्षितांनी रामायणाचा पाठ केला व त्यानंतर मी दासबोधाच्या पाठाचे वाचन केले. साईसाहेब सायंकाळच्या रपेटीस बाहेर जातानाचे वेळी आम्ही सर्वांनी साईसाहेबांचे दर्शन घेतले आणि वाडा आरतीनंतर आम्ही सर्व शेजारतीला हजर राहिलो. रात्री भीष्माने भागवताचा आणि श्री. दिक्षितांनी रामायणाच्या पाठाचे वाचन केले.

गुरुवार, दिनांक ८-१२-१९१२.

मी सकाळी काकडआरतीस उठलो आणि त्यानंतर दैनंदिन कार्यक्रमास सुरूवात केली. नारायणराव बामणगावकरांना परत जाण्याची परवानगी मिळाली. माझ्या पत्नीच्या काही वस्तू त्यांना अमरावतीस द्यावयाच्या होत्या त्यामुळे ते टांग्यातून रवाना झाले. ते निघण्याच्या पूर्वी माझे एक नातलग सातारला कारभारी होते. त्यांचे पुत्र

गणपतराव तीळ संक्रांतीच्या रिवाज प्रथेप्रमाणे तिळाच्या वस्तूंची भेट घेऊन आले. तीळ व साखर यांनी मिळून बनविलल्या काही कलात्मक प्रकारच्या वस्तू त्यात होत्या. या तीन आठवड्यात बलवंत आज प्रथमच बाहेर पडला. तो मशिदीपर्यंत गेला आणि साई महाराजांच्या चरणांवर त्याने तिथे मस्तक ठेवले. आतापर्यंत त्याच्यात सुधारणा झाली आहे. गणपतरावांची अशी इच्छा होती की माझा मुलगा बलवंत याने रंगपंचमी सण साजरा करण्यासाठी सातारला चलावे. मी त्यांना साई महाराजांजवळ तशी परवानगी मागण्यासाठी सुचविले. दुपारची माध्यान्ह आरती नेहमीप्रमाणे विधीपूर्वक झाली खरी पण आरतीच्या शेवटी शेवटी साईसाहेबांनी राग प्रदर्शित केला. आम्ही दुपारची वेळ नेहमीप्रमाणे घालविली. दिक्षितांनी रामायणाच्या पाठाचे वाचन केले व मी स्वतः दासबोध वाचले. सकाळी आम्ही पंचदशीच्या पाठाचे पण आयोजन केलेले होते. साईसाहेब सायंकाळच्या रपेटीस निघाले असताना आम्ही त्यांचे दर्शन घेतले. मुंबईहून श्री. कुलकर्णी नावाचे सज्जन येथे आले आहेत. तिथे त्यांची एक प्रयोगशाळा आहे तिथे स्थानिक खनिज इत्यादी इत्यादींचे परीक्षण केले जाते. त्यांनी सांगितले की मी तुम्हाला १९०७ साली सुरतेस पाहिलेले आहे. आम्ही बसून काही जुन्या वस्तूंच्या संबंधी चर्चा गप्पा केल्या. रात्री भीष्मान भजन व दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले.

## "माझा फकीर"

आज इथे तर उद्या तिथे,
बेफिकिरीचं हे जगणं माझं,
त्याची फिकिर करतोय माझा फकीर.
त्याच्या श्वासावर मी जगत आहे,
नैवेद्याचा त्याचा घास,
आता माझा झाला आहे.
जिथं मी जावं तिथं -
अगोदरच तो पोचलेला असतो.
भीड कशाची मग उरत नाही -
खंत कशाचीच वाटत नाही.
उडत्या पाखरागत सारं विश्व माझंच
होवून जातं –
कारण -
ह्या विश्वावर राज्य करणारा "जगदीश्वर"
हा माझाच फकीर असतो.

**– डॉ. अनिल मोरे**
अल्याळी, आंबेवाडी.

# गुरूदेव भक्तासाठी घेतो धाव!

– श्री. बाळकृष्ण अर्जुन देसाई
सी/३, हरमेस पार्क
३०, बंडगार्डन रोड, पुणे - ४११ ००१

तुमच्यावर जेव्हा संकटे कोसळतात, तेव्हा तुम्ही साईबाबांना आर्त स्वरानं हाका मारून सहाय्यासाठी बोलाविता, नि बाबा असतील त्या स्थितीत तुमच्या पाठीशी उभे राहून तुमच्यावर कोसळलेलं अरिष्ट तात्काळ दूर करतात. तुम्ही कुठेही असा! तुमची उदी नि तुमच्या नावाचा घोष दु:खिताच्या मनाचं सांत्वन करायला तात्काळ धाव घेतो ही किमया काही साधी नव्हे!

तुम्ही साक्षात् श्री गुरूदेव असून, मानवी स्वरूपात वावरून लोकांना दर्शन देता, नि त्यांचं भलं करता, ही काही जादू नव्हे. तो दृढ भक्तीचा साक्षात्कार आहे. निस्सीम भक्ती अन् सबुरी यांनीच आमचं कल्याण होत असतं. जो ह्या मंत्राचा मनापासून स्वीकार करतो, नि तो आचरणात आणतो, त्याचं भलं केल्याशिवाय बाबा, तुम्ही कधीच स्वस्थ बसत नाही.

प्रभु साईनाथा, तुमची लीला अगाध, तशीच अतर्क्य आहे. तुमचे भक्त कोण नाहीत? साऱ्या धर्माचे लोक आज एकोप्यानं तुमच्या नावाचा जयजयकार करून एके ठिकाणी मांडीला मांडी भिडवून खातात, पितात नि तुमचे गुण गातात. आज तुम्ही प्रत्यक्षात दिसत नसूनही कुणीही तुम्हाला हाक मारून संकटातून मुक्त करण्याची विनंत करतो, नि तुम्ही त्या विनंतीला ताबडतोब प्रतिसाद देता, ह्याची उदाहरणं अनेक आहेत. ही आपली अगणित लीलाचं आहे.

आम्ही सारे भक्त आपली मूर्ती डोळ्यापुढं आणून कोणत्याही कार्यारंभी आपणास हाक मारतो, नि ते कार्य उत्तमरित्या पार पडल्याचं प्रत्यक्षात पाहातो. ही सारी आपलीच किमया! तुम्हावाचून आम्हाला दुसरा त्राता कोण आहे? साईश्वरा, तुम्हीच आम्हा पतितांचे पावनकर्ते आहात! नाना वेशानं येऊन, तुम्ही भक्तांची कामं सुरळीत पार पाडू शकता, नि त्या भक्ताला आधार देता, हाच सर्वात मोठा फायदा आहे.

नाम मुखी राहो निरंतर साई प्रभु तुमचे।
मग भक्तमनि मुळी नाव उरेना कधीच दुरिताचे॥
साईराम, साईराम! भक्ता देई सदा आराम॥

– जो मनाला जिंकतो त्याला परमात्म्याचा लाभ झालेला असतो, कारण त्याला शांती प्राप्त झालेली असते. अशाप्रकारच्या मानवाला सुख-दु:ख, उष्णता-थंडी, मान-अपमान हे सर्व समान वाटतात.

ग्रंथपरिक्षण

# श्रीसमर्थ वाग्देव महाराज चरित्र

लेखक - श्री. कृष्ण जगन्नाथ थळी, प्रकाशक - श्री. शंकरराव कृष्ण थळी (आर्टिस्ट), पारिया बिल्डिंग, १ ला मजला, कामाबाग समोर, न्यू चर्नी रोड, मुंबई ४००००४. किंमत १४ रुपये पोस्टेज ८ रुपये पृष्ठे २४४.)

वाठारचे सगुणमूर्ती श्रीसमर्थ भगवान वाग्देव महाराज हे महाराष्ट्रातील एक खास जन्मसिध्द अवतारी पुरूष होऊन गेले. त्यांचा जन्म जगद्धोरासाठीच होता. त्यांचा जन्म इ. स. १८४५ चा व निर्याण ८-१-१९३६ रोजीचे. त्यांची समाधी वाठार येथे आहे. या श्रेष्ठ संत पुरूषाचे वाचनीय असे चरित्र महाराजांचे एक परमभक्त श्री. कृष्ण जगन्नाथ थळी यानी लिहिले व ते त्यांचे चिरंजीव श्री. शंकरराव जगन्नाथ थळी यांनी प्रकाशित केले. या चरित्र ग्रंथात चार भाग असून पहिल्या भागात श्रीसमर्थ वाग्देव महाराजांचे चरित्र १ ते १६४ पृष्ठात दिलेले असून त्यातून महाराजांच्याबद्दलची बरीचशी बारीक सारीक माहिती मिळते. दुसऱ्या भागात श्रीसमर्थांचे मौल्यवान मुखोद्गार, तिसऱ्या भागातून महाराजांचे भक्तांना आलेले अनुभव व चौथ्या भागातून श्रीसमर्थांच्या विषयीची पदे व अभंग दण्यात आलेले आहेत. पुस्तकात ठिकठिकाणी चित्रेही देण्यात आलेली असल्याने ग्रंथाच्या आकर्षकतेत भर पडून तो वाचनीय झाला आहे. श्री महाराजांचे वास्तव्य अखेरच्या काळात श्री. थळी यांच्याकडेच मुंबईत गिरगावात होते. तिथे आजही त्यांचा झेंडा, पादुका व देव नि इतर साहित्य पहावयास मिळते. ज्या भाविकांना हा दुर्मिळ होत चाललेला ग्रंथ घ्यावयाचा असेल त्यांनी वरील ठिकाणी संपर्क साधावा. तिथे ग्रंथही मिळेल आणि महाराजांच्या सर्व वस्तूंचेही दर्शन घेता येईल, असा दुहेरी फायदा होईल.

**— साईनंद**

# श्रीसाई अभंगमाला

रचनाकार व प्रकाशक - श्री. जनार्दन नामदेव पाखरे, मु. पो. कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६२१६.

साईभक्त श्रीसाईलीलाचे कवी नि कागलचे एक शिक्षक श्री. जनार्दन नामदेव पाखरे यांनी श्रीसाईबाबांवरच रचलेल्या ५० कवितांचा हा संग्रह छोटेखानी पुस्तकाच्या रूपाने रामनवमीस प्रकाशित झाला असून तो साईभक्ताने साईकाव्याचा एक चांगला संग्रह म्हणून आपल्या संग्रही ठेवण्यास हरकत नाही. या पुस्तकास श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष मा. विक्रमसिंह जयसिंगराव घाटगे यांनी अनुदान दिले आहे, याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो.

**— साईनंद**

## "श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज प्रणीत नाम महात्म्य (काव्य-ग्रंथ)"

(कवी - श्री. दिनकर देवळेकर, प्रकाशक - श्री. पांडुरंग लक्ष्मण किरवे, अमित आनंद सोसायटी, पाच पाखाडी, ठाणे (पश्चिम). पाने ९६, किंमत १० रू.)

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने, सर्वश्रुतच आहेत. प्रत्येक दिवसाला एक, अशी वर्षाची ३६६ प्रवचने लिहून त्यांनी नामाचे महात्म्य विविध विवेचनाद्वारे, भाविकांपुढे ठेवले आहे. नामाच महत्व विषद करतानाच, प्रभू रामचंद्राचे अनन्य साधारण महत्व व महतीही त्यांनी भक्तांना आवर्जून सांगितली आहे.

महाराजांची ही प्रवचन नेमक्या शब्दात काव्यरूपाने भाविकांपुढे ठेवण्याची प्रेरणा श्री. दिनकर देवळेकर यांना होऊन, प्रत्यक्ष श्री गोंदवलेकर महाराजांच्या साक्षात्कारी आशीर्वाद लाभला नि ह्या प्रेरणेतूनच महाराजांच्या प्रवचनांवर सहज सुंदर काव्यग्रंथ तयार झाला.

प्रथम प्रवचनांच्या क्रमांकानुसार सर्व काव्य लिहून झाल्यावर, सद्‌गुरू इच्छेनुसार, ह्या ग्रंथाची तीन भागात विभागणी केली आहे. सर्वप्रथम कवीचे आत्मनिवेदन असून, पहिल्या भागात नामजपाचे महत्व वर्णन केले आहे.

दुसऱ्या भागात प्रपंच साधून, परमार्थ कसा करावा ह्याचे वर्णन आहे. तिसऱ्या भागात त्यांनी संतसंगतीचे महात्म्य व त्याची परमार्थातील अनन्यसाधारण महती वर्णन केली आहे. चौथ्या भागात काही स्फूट-काव्य देण्यात आले आहे.

**सद्‌गुरू श्री साटम महाराज तसेच त्यांचे शिष्य, श्री सदानंद सरस्वती यांचा अनुग्रह कृपाप्रसाद, कवी श्री. देवळेकरांना मिळाला असून, अखंड राम-नाम जपामुळे महाराजांच्या प्रवचनांवर आपल्या प्रासादिक, भक्तिरसपूर्ण, श्रध्दाळू, साध्या-सोप्या सहजसुंदर शब्द रचनेने त्यांनी हा काव्यग्रंथ भाविकांपुढे ठेवला आहे.**

**कवी**: श्री. दिनकर म. देवळेकर
रविउदर, सोसायटी, बी-३/४,
चेंदणी कोळीवाडा, ठाणे(प.).

– **श्री. भालचंद्र गंदे**, ठाणे.

---

– योग्याने स्वतःचे चित्त निरंतर ईश्वरावर एकाग्र करण्याचा कयास करावा. त्याने एकान्तात एकाकी रहावे आणि नित्य स्वतःच्या मनाला अपूर्वाईने वश करावे. त्याने वासना आणि संग्रहाच्या भावना यांतून मुक्त असावे.

# तुमचे श्रीविठ्ठलासंबंधीचे सामान्य ज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व दता आल्यास उत्कृष्ट समजावे.)

१) महाराष्ट्राची ....... काशी म्हणून पंढरपूर या क्षेत्राचा उल्लेख केला जातो.
   अ) दक्षिण, ब) पूर्व, क) पश्चिम, ड) उत्तर.

२) पंढरपूर हे तीर्थक्षेत्र ........ नदीच्या तीरावर वसलेले आहे.
   अ) अलक·ंदा, ब) धवलगंगा, क) चंद्रभागा, ड) कावेरी.

३) श्रीविठ्ठलाच्या ...... नामक भक्ताने पंढरपूर हे क्षेत्रनगर निर्माण केले.
   अ) पांडुरंग, ब) पुंडलिक, क) गोविंद, ड) राणू.

४) श्रीविठ्ठलाच्या पत्नीचे पूर्वाश्रमीचे नाव होते .......
   अ) मायावती, ब) सत्यवती, क) पद्मावती,ड) रूपवती.

५) 'विठ्ठल' हा शब्द ........ द्रविडी शब्द आहे.
   अ) शिवसूचक, ब) विष्णूसूचक, क) कृष्णसूचक, ड) देवीसूचक.

६) १९४७ साली ...... यांनी पंढरपूर येथे उपोषण सुरू केले होते.
   अ) शंकरराव देव, ब) दादा धर्माधिकारी, क) विनोबा, ड) साने गुरूजी.

७) फादर डलरी हा विठ्ठलाचा ....... भक्त होय.
   अ) फ्रेंच, ब) जर्मन, क) स्वीडीश, ड) पोलीश.

८) चंद्रभागा या नदीचा उगम ..... येथे झाला आहे.
   अ) कैलास पर्वत, ब) नंदादेवी, क) भीमाशंकर, ड) कळसूबाई.

९) पंढरपूरच्या प्रत्यक्ष श्रीविठ्ठल मंदिरात जाण्यासाठी १२ पायऱ्या चढाव्या लागतात त्यापैकी पहिल्या पायरीस ...... म्हणतात.
   अ) निळोबाराय पायरी, ब) नामदेव पायरी, क) गोरोबाकाका पायरी, ड) जनाबाई पायरी.

१०) कैकाडी महाराजांचा आश्रम पहावयाचा असेल तर तुम्हास ...... येथे जावयास हवे.
   अ) पुणे, ब) पुणतांबा, क) पेण, ड) पंढरपूर.

११) श्रीविठ्ठलाने पोषाख केल्यावर त्यास जे सेवेकरी मागून पुढून आरसा दाखवितात त्या सेवेकऱ्यांना ....... म्हणतात.
   अ) हरिदास, ब) डिंगरे, क) दिवटे ड) बेणारी.

१२) विठोबा प्रमाणेच रूक्मिणीच्या पुजाऱ्यांना ....... म्हणतात.
   अ) बडवे, ब) परिचारक, क) उत्पात, ड) डांगे.

— सदानंद चेंदवणकर

उत्तरे:

१) - अ, २) - क, ३) - ब, ४) - क, ५) - ब, ६) - ड, ७) - अ, ८) - क, ९) - ब, १०) - ड, ११) - ब, १२) - क.

# सत्संगाचा लाभ घ्या!

— **श्री. रामकृष्ण अंकुश गवंडे**
तुंगेकर बिल्डिंग, दुसरा मजला,
अजय शॉपिंग सेंटरसमोर,
टाकणदास कटारिया मार्ग,
माहिम, मुंबई ४०० ०१६.

परमेश्वराचे दर्शन सहजपणे घ्यावयाचे असेल तर ते सत्संगात घ्या. तेथे समता असते. गरीब-श्रीमंत असा भेद नसतो. कोणीही येतो आणि कोठेही बसू शकतो. तेथे कोणालाही आडकाठी केली जात नाही. परस्पर चांगल्या लोकांच्या सहवासात बसायला मिळते. गौरवाची अनुभूती मिळते, संतोष मिळतो आणि हाच तर त्या परमात्म्याचा सूक्ष्म प्रसाद होय.

जगात गोड वस्तू कोणती? दही, द्राक्षे, गूळ, साखर या वस्तू स्वयं गोड असतात. मधुरता ही गुळात किंवा साखरेतच असते असे नव्हे. ज्याला जे आवडते ते त्याच्यापुरते मधुरच असते. ज्याचे मन ज्या ठिकाणी लागले आहे तेच त्याच्यापुरते मधुर असते.

सत्संगाला आपण मधुर समजत आहोत आणि ते सारे मधुर करून घेत आहोत. ही त्या परमात्म्याची कृपा होय. आणि त्या प्रभूची कृपा झाली तरच सत्संगाचे निमित्त होऊन त्याचे भजन, किर्तन श्रवण करण्याची संधी मिळेल.

सत्संगाला योगवशिष्टात नेत्राची उपमा दिली आहे. रूपाची व्याख्या कितीही करा. नेत्राशिवाय वर्णन करता येणार नाही. कान असल्याशिवाय गाण्याचा आनंद लुटता येणार नाही. तो वर्णन करून सांगण्यासारखा विषय नाही. अशी कितीतरी फळे जगात असतील जी आपण खाल्लेली नसतील, तर ती किती मधुर आहेत हे सांगून कसे समजणार. ती खाऊनच त्याची चव पहावी लागेल. रस जोपर्यंत जीभेवर जात नाही, तोपर्यंत चव कशी आहे ते कळणार नाही. आपल्या बुध्दीत जर संसार भरून वहात असेल तर सत्संगात मजा येणार नाही, आनंद घेता येणार नाही!

माणसाच्या बुध्दीत एक मोठा दोष आहे आणि तो म्हणजे जडता (हट्ट). मला जे करावयाचे ते मी करणारच. अशा काही सवयी असतात, त्या आपण सोडू शकत नाही. कोणी आपणाला भेटायला आला तर आपण लागलीच म्हणतो— मी आताच तुमची आठवण केली होती. हा शिष्टाचार झाला. परंतु खोटे बोलणे हे पाप आहे.

सत्संगामुळे तुमचा नेहमी आदर होतो, मोठा मान केला जातो. धन आहे, परिवार आहे, मान आहे, जगातली सारी सुखे हात जोडून तुमच्यासमोर उभी आहेत, सारे काही तुमच्याजवळ आहे, पण इतके सारे असूनसुध्दा मनात चिंता मात्र अनेक असतात. सत्संगाने या चिंता दूर होऊ शकतात.

जसे व्यायाम केल्यामुळे शरीर पुष्ट होते, निरोगी राहते, खूप भूक लागते, अन्नाचे चांगले पचन होते, तसेच आपल्या सूक्ष्म शरीराच्या निरोगीपणाचे सत्संग हे एक उत्तम भोजन आहे. त्याने हृदय मजबूत होते, मन निरोगी बनते. सुखदु:खाचा, मान-अपमानाचा, धनदौलतीचा, कशाचाही तुमच्यावर परिणाम होणार नाही. तुम्ही त्यातून सहज तरून जाल.

माझ्यामध्ये, माझ्याच प्रेरणेने, माझीच माया, माझाच संसार रचित असते. तुमच्या हृदयात असलेल्या या मायेचा ज्ञानाने नाश केला पाहिजे.

सत्संगाला शांत वातावरण असते. तेथे मन प्रसन्न होते. संसारातल्या कष्ट, दु:ख, चिंता आदि गोष्टींना तेथे थारा नसतो. भगवतकथा श्रवण हे त्यावरील एक अद्‌भुत औषध आहे.

म्हणूनच सत्संगाचा अवश्य लाभ घ्या!

(हरद्वारच्या स्वामी कृष्णानंद यांच्या प्रवचनाचे आधारे)

★★★★★★★

# "हितगुज"

मज नसे जरी आई
हे साई, मी तुज म्हणू का माझी आई?
संकटकाळी तू धावत येई।
साई माझी आई साई माझे तात,
देती मज रोज प्रसादाचा हात।
हे, कृपेच्या सागरा
तुम्हीच माझे जीवन उध्दारा।
तू कल्पतरू राही मम द्वारी।
हिच विनवणी वारंवारी।
नित्य घडो संतांची संगत
मलीन वासना नको मनात
रोज नको मज खाया मेवा
"साई" नाम मनी हा अखंड ठेवा॥

**— सौ. अपर्णा रमेश पाठारे**
बी-१, कोटी उड्डाण, आकुर्ली लेन,
मु. पो. कांदिवली (पूर्व), मुंबई.

# इति श्री साई उवाच

८७ (मागील अंकावरून क्रमशः) **– संकलन – श्री. डी. जी. देशपांडे**

पाहूनि तयाचा अट्टाहास। बाबा मधुर बोलती तयास।
"काय बिघडले रे रामदास। व्यर्थ सायास कां वहासी॥
अरे शामा आपलाच पोरगा। तूं कां शिरा ताणिसी उगा।
किमर्थ इतका कष्टसी वाऊगा। तमाशा जगा दाविशी॥
ऐसा कैसा तूं कलहतत्पर। कां न बोलावे मधुरोत्तर।
अरे ह्या पोथ्या पढतांही निरंतर। अजुनि अंतर अशुध्द॥
प्रत्यही अध्यात्मरामायण पढशी। सहस्त्रनामाचे आवर्तन करिशी।
तरीहि उच्छृंखलवृत्ति न त्यजिसी। आणि म्हणविशी रामदास॥
ऐसा कैसा तूं रामदास। तुंवा सर्वार्थी असावे उदास।
तरी तुटेना पोथीचा सोस। काय त्या कर्मास सांगावे॥
रामदासीं नसावी ममता। सान थोरी असावी समता।
त्या तुझी या पोरासीं विषमता। झोंबसी हाता पोथीस्तव॥
जा बैस जाऊन स्थानावरी। पोथ्या मिळतील पैशा पासरी।
माणूस मिळेना आकल्पवरी। विचार अंतरीं राखावा॥
तुझ्या पोथीची काय महती। शाम्याला त्यांत कैची गती।
उचलली ती म्यांच आपमतीं। दिधली तयाप्रति मींच ती॥
तुला ती तों मुखोद्‌गत। शाम्यास द्यावी आलें मनांत।
वाचील ठेवील आवर्तनांत। कल्याण अत्यंत होईल"॥ – अ. २७ वा

८८

"बापूसाब ही कशाची काई"। बाबा ते ठायीं पूसती॥
हा वाच साद्यंत। कल्याणप्रद होईल॥

– अ. २७ वा

८९

सांगूं काई। काय या अन्नाची अपूर्वाई।
पूर्वी ही एक वाण्याची गाई। दूधाळ लई लठ्ठ असे॥
मग ती कुठें नाहीशीं झाली। माळियाकडे जन्मास आली।
तीच पुढे क्षत्रियाकडे गेली। पत्नी झाली वाणियाची॥
पुढें ही उपजली ब्राम्हणापोटीं। बहुता काळाने पडली दृष्टी।
प्रेमाचे दोन घांस पोटीं। सुखसंतुष्टी जाऊ दे॥
'राजाराम। राजाराम' वद वाचे॥
ऐसे म्हणत राहीं नित। सफल होईल आई जीवित।
शांत होईल तुझें चित्त। हित अपरिमित पावसील॥

– अ. २७ वा

९०
"माझा माणूस देशावर। असो कां हजारों कोस दूर।
आणीन जैसें चिडीचे पोर। बांधून दोर पायास॥

— अ. २८ वा

९१
"साले रस्ते में भजन करते।
और दुसरे आदमी कू पूछते। क्या दूसरे से पूछना॥
सब कुच आपने आंखों से देखना। काय कू दुसरे आदमी कू पूछना।
झुटा है क्या सच्चा सपना। कर लो आपना बिचार आप॥
मारवाडीसे लेकर उछिती। क्या जरूर दर्शन की होती।
होई क्या अब मुराद पूरती"।
"सांजा ताटभर घेऊन ये मज। आरती पूजन मग करीं॥
"भूक लगी है अच्छा हूवा। कमर में दर्द चाहिये दवा।
अब सांजे की चली है हवा। करी सवार आरती"॥

— अ. २८ वा

९२
पूर्जेत त्वां आजला खंड पाडिला।
पूजा पावल्या सर्व देवांला। एक राहिला पूजेविण॥
जा ती करून ये मग येथें। मेघा वदे
जा तूं पाहें। दार आतां उघडें आहे।

— अ. २८ वा

९३
पुरवीं तुझाचि काम।

— अ. २८ वा

९४
"मेघा त्रिशूल काढी रे"।
"दृष्टांत कसला।
शब्द नाहीं का माझा परिसिला। काढ म्हणितला त्रिशूळ तो।
दृष्टांत म्हणूनि माझे बोल। जातां काय कराया तोल।
बोल माझे अर्थ सखोल। नाहीं फोल अक्षरही"॥
"माझीया प्रवेशा न लगे दाट।
नाहीं मज आकार ना विस्तार। वसें निरंतर सर्वत्र॥
टाकूनियां मजवरी भार। मीनला जो मज साचार।
त्याचे सर्व शरीर व्यापार। मी सूत्रधार चालवीं"।
"हां शंकर आला। सांभाळी यांजला तूं आतां"।

— अ. २८ वा

९५
"तुझ्या बापाचे मी काय लागें। उठली ती सुटली माझ्यामागें।
फुकटखाऊ मेले निलागे"। म्हणावे रागें बाबांनीं।।

— अ. २९ वा

९७
"कृतकर्म अवश्ये पाहिजे भोगिले"।
"असेल केले जन्मांतरी।।"
"आतांचा तुझा नमस्कार। आणि यापूर्वी जे घालीस निरंतर।
आहे काय दोहींत अंतर। करून विचार सांगे मज।।"
"नाहीं काय तुझीया चित्तीं। मुसलमानाच्या देवांची भक्ति।
पंजा नाहीं का तुझीया सदनी। पूजीत नाहींस का ताबुताचे दिनीं।
काड बिबीं ही आहे सदनी। लग्नकार्यासी तिजला पूजुनी।
तुष्टवितोसना मानपानी। मुसलमानी दैवत हें"।।
"अल्ला मालीक बहोत देगा। अल्ला तुमारा अच्छा करेगा"।

— अ. २९ वा

९८
"सांगे तयास माझें मानें।
पत्रिका ठेवीं गुंडाळून। बैसें जो स्थस्थमन परीक्षे।।
नादा कुणाच्या लागूं नका। जन्मपत्रिका पाहूं नका।
सामुद्रिका विश्वासूं नका। चालवा निका अभ्यास।।
म्हणावे मुलास येईल यश। स्वस्थ चित्तें परीक्षेस बैस।
होऊं नको असा निराश। ठेवीं विश्वास मजवरीं।।

— अ. २९ वा

९९
"हा ज्याचा त्यास देईं। सवे हा उदीचा प्रसाद नेईं।
नलगे आम्हास तुझें कांहीं। स्वस्थ राहीं म्हणें तया"।।

— अ. २९ वा

१००
"त्याला कसला द्यावयाचा। आपणासचि तो ठेवावयाचा"।
"तरीही तो देईल। रूपये पंचवीस याचे मोल।
हा मी यासी देईन बदल।" बोल तयाला।।
म्हणती रूपयांचे ढिगार लाविले। तरी त्या रूपयासवें न तोलें।
उणें ते मोलें तयापुढें।।

— अ. २९ वा

१०१
जाऊनि सप्तशृंगीच्या मंदिरी।
वाहे तिर्चीं तीस चरणावरी। स्तन् हीं साजिरी निजहस्तें।।

— अ. ३० वा

१०२
टांगा घेऊन जा रहात्यासी। खुशाल भाऊसी घेऊन ये।।
जाहले की दिवस बहुत। भेटावयाची मनीं आर्त।
म्हणावे बाबांनीं तुम्हाप्रत। भेटीप्रित्यर्थ बोलाविले।।
"मजकडे येऊन जा"।

# शिरडीनाथा

साईनाथ मज एक निवारा
झडोत कितीही संकट धारा!
मन ठेवियले तुमच्या पायी
सुटतील कोडी कृपे सहज ही!
प्राथियते मी काया-वाचा-मनी
विनवीतसे मी शरण येऊनी
संसाराची भीति सर्वदा
विसरू नको तू सबुरी श्रध्दा.
'साई-शब्द' हा त्रिवार सत्य
माथी राहो करूणेचा हस्त!
तुमच्या हाती जीवन नौका
हाक अंतरी तुम्हीच ऐका!
आठविता गहिवरते अंतर
गुणगुणते मी नाम निरंतर
विश्वासाने धरिले हाता
तुजविण अन्य न शिरडीनाथा!

**— सौ. वासंती नांदेडकर**
एम. ए.,
महिंद्र आणि महिंद्र लिमिटेड,
पथ क्रमांक १३, वरळी, मुंबई - ४०००१८.

# श्री साईनाथांची उदी - एक दिव्यौषधी

- सौ. मृणालिनी प्र. भुर्के
११७/३८२९, नेहरूनगर,
मुंबई - २४

साईलीलाच्या असंख्य वाचकांना तसेच साईवाङ्मय वाचणाऱ्या, किंबहुना श्री साईबाबांच्या कुणाही उपासकाला या गोष्टीची मनोमन खूणगाठ असते की, मनात योजलेले एखादे कार्य, मग ते कितीही दुष्कर असो, साईबाबांच्या स्मरणाने, त्यांना कळवळून केलेल्या प्रार्थनेने आपल्या कार्याची यशस्वी वाटचाल प्रगतीपथावर होत असल्याचा अनुभव येत असतो. तसेच क्षणोक्षणी साईबाबांच्या अतर्क्य अश वरदहस्ताची जाणीव आपण नेहमीच अनुभवतो. केव्हा केव्हा काही क्षुल्लक गोष्टींसाठी सुध्दा आपण बाबांना हाक मारतो, त्यांना साकडे घालतो तेव्हा साईबाब आपली मायमाऊली असते ना! मग आपण आपले वय विसरून लहान बालक बनतो बालकाने आईजवळ हट्ट करावा, काही मागावं, नाहीतर कुणाजवळ जावं! यासाठीच या साईमाऊलीला आपण स +आई +बाबा असे संबोधतो. कित्येकदा भक्तांचे काही अनुभव वाचल्यानंतर काही मंडळी बोलतात "हा कसला अनुभव? यात काय मोठेसे आम्ही तर असल्या गोष्टी पावलोपावली अनुभवतो!" पण आपला अनुभव शब्दांकित केला, इतरांना सांगितला तर त्याचा आनंद द्विगुणित होतो. आपल्याबरोबर इतरांनाही त्याचा आनंद मिळावा, हे योग्य नाही का!

श्री साईबाबांच्या उदीबद्दल तर सांगणे नकोच! ही उदी म्हणजे धन्वंतरीचे रसायन एखादा दुर्धर रोग या उदीच्या सेवनाने बरा झाला, असे एखाद्या साई उपासकाने सांगितले, तर मुळीच आश्चर्य वाटणार नाही. कारण माझाही तसा अनुभव आहे

गेल्या तीन चार वर्षांपूर्वी उन्हाळा सुरू झाला की, माझ्या दोन्ही पायांवर काही काही ठिकाणी गुलाबी चट्टे उठत. प्रथमत: मी दुर्लक्ष केले. नंतर काही मलमे लावली पण काही गुण येईना, तेव्हा डॉक्टरकडे गेले. त्यांच्या औषधोपचाराने तात्पुरता गुण आल पण औषध घेणे बंद केल्यावर पूर्ववत् चट्टे दिसू लागले. स्पेशालिस्टला दाखविले परंतु कुणालाच निदान झाले नाही. तात्पुरते बरे वाटे. पावसाळा, हिंवाळ्यात आराम असे, उन्हाळा सुरू होताच परत चट्टे दिसू लागत. एकदा आमच्या कॉलनीतील एका मैत्रिणीकडे मी गेले होते. बोलण्याच्या ओघात मी माझे दुखणे तिला सांगितले. तिने उदीचा डबाच माझ्यापुढे आणला व आपल्या हाताने तिने श्री साईंची उदी माझ्या पायांना चोळून लावली व घरी नेण्यासही दिली. घरी आल्यावर साईबाबांना प्रार्थना करून त्या डागांवर उदी चोळायचा व सेवन करायचा मी परिपाठ चालू ठेवला. काही दिवसातच सर्व डाग नाहीसे झाले. त्यानंतर अद्याप परत डाग उठले नाहीत. ही माझी मैत्रीण म्हणजे सौ. सावंत. या परम साईभक्त आहेत. त्यांच्याच कृपेने मला या परमौषधीचा अनुभव आला. सौ. सावंत यांच्याजवळ साईबाबांच्या उपासनेच्या

अनुभवांचे भांडार आहे. त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी करायला मिळणे, म्हणजे एक पर्वणीच असते. बोलता बोलता ४/५ तास केव्हाच जातात, हे कळतच नाही. धन्य ते साईबाबा, ज्यांनी आपल्या लेकरांच्यां कल्याणासाठी एक दिव्यौषधी, अमोघ शक्ती, अमोल ठेवा उदीरूपाने मागे ठेवला आहे!

# मानवी जीवनाचे सार्थक

– श्री. शेषराव ठाकरे
एम्. कॉम.
महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ,
काटोल, जि. नागपूर.

मनुष्य जीवनाच्या कर्तव्याची सुरुवात कडू असते. परंतु तिला कंटाळून भागणार नाही. पुढील प्रगती त्या कडवट कर्तव्याच्या पोटीच जन्माला येत असते.

'जीवन' या शब्दात तीन अक्षरांचा समन्वय आहे. परंतु त्याची व्यापकता अथांग आहे. जगणे ही अत्यंत सोपी गोष्ट आहे. जगण्याची इच्छा मात्र हवी. जगण्याची इच्छा ही हलक्या रबराच्या चेंडूसारखी असते, जिला कितीही संकटमय सागरात बुडविण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी ती पोहतच राहते. जीवन जगण्याचा मार्ग वाटतो तसा कंटकमय नाही. परंतु जीवन जगत असताना कोणत्या मार्गांनी जगावे, हे प्रत्येकाच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते.

जीवन जगत असताना, ते जीवन नेहमी दुसऱ्याच्या उपयोगी पडेल, ही भावना असावी. खाणे, पिणे, राहणे याकरिता मनुष्य जीवन नाही. तर त्याला आपल्या जीवनात बऱ्या वाईट कृत्यांचा खेळ खेळून, ह्या जीवनरूपी संसाराची नाव पार पाडायची आहे. मनुष्याचे जीवन 'क्षणिक' आहे. म्हणून मनुष्याने चंदनापरी दुसऱ्यासाठी आपल्या जीवनाचे सार्थक करायला पाहिजे. "स्वत:साठी जगलास तर मेलास आणि दुसऱ्यासाठी जगलास तर जगलास" ह्या म्हणीचे स्मरण करायला पाहिजे. कारण आपली जीभ चांगली असेल, तर सारे जग आपणास चांगले म्हणेल.

वृक्ष तोडत असताना, त्या तोडणाऱ्यास तो वृक्ष स्वत:ची छाया काढून न घेता सावली देतोच. त्याचप्रमाणे मनुष्याच्या जीवनात कितीही अडथळे, दु:खं निर्माण झाली, तरी त्यांचे स्वागत करून आपले जीवन समाज सेवेकरिता अर्पण केले पाहिजे, जसे भगतसिंगाचे जीवन होते. त्यांनी अल्पवयात राष्ट्राच्या सेवेकरिता फाशी पत्करली. आपले दैव परमेश्वराच्या स्वाधीन असेल, पण आपली कृत्ये आपल्या स्वाधीन आहेत. त्यांचा या जीवनात योग्य उपयोग व्हायलाच पाहिजे.

जीवनाचे अलंकार म्हणजे प्रेमाचं पाणी! जीवनरूपी बाग फुलवायची असेल,तर त्या बागेला प्रेमाचं ओलीत करायला पाहिजे. जीवनाचा कठीण मार्ग आक्रमताना दगडासारखे कठोर बनून,त्या समस्यांना तोंड देऊन,जीवनाचा उध्दार केला पाहिजे. कारण "बळ हेच जीवन, दुर्बलता म्हणजे मृत्यू." विनोबाजींच्या मते,"मनुष्य जीवन अनुभव का रास्ता है"। जीवनाला कठोर बनविल्याशिवाय आयुष्याचे उद्यान फुलत नसते.

मनुष्याचे जीवन दु:खांनी ओथंबलेले आहे,असे म्हणतात. परंतु शेक्सपियर यांच्या मते "व्यक्ती तब तक दुखी है, जब तक वह खुदको दुखी मानता है।" जोपर्यंत मनुष्याच्या जीवनाचे घर्षण सुखदु:खाशी होत नाही, तोपर्यंत त्यास आपल्या प्रगतीचा टप्पा अदृश्यच राहतो. मनातील भावना गुप्त ठेवणारी 'शंका' काढून आणि मनातील विचार जागृत करणारी भीती यासी दोन हात करून मनुष्याने पुढचे पाऊल टाकायला पाहिजे. हजारो सूर्य एकत्र आले तरीही सत्यरूपी सूर्याची बरोबरी करू शकणार नाहीत. सत्याचे दर्शन अहिंसा,प्रेमधर्म याखेरीज अशक्य आहे आणि अहिंसेचे पालन आत्मशुध्दीशिवाय अशक्य आहे. तसेच अशुध्दात्मा परमात्म्याचे दर्शन घेऊ शकत नाही. म्हणूनच साई म्हणतात,शुध्द भावनेने माझेवर विश्वास ठेवा,मी निरंतर तुमच्या सेवेला व मदतीला हजर आहे.

## शिष्यवृत्ती

**श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचेकडून सन १९८८ करिता गरीब व हुशार अशा पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात येणार आहे. तरी इयत्ता १० वी (नवीन एस्. एस्. सी.) वा त्यापुढील कोणत्याही महाविद्यालयीन तसेच कोर्सेसच्या परिक्षेत शेकडा ६० टक्के किंवा त्याहून जास्त गुणसंख्या असणाऱ्या विद्यार्थ्यांनी, तसेच टंकलेखन व लघुलेखन कोर्ससाठी मात्र शेकडा ७५ टक्के पेक्षा अधिक "अे" ग्रेड असणाऱ्या विद्यार्थ्यांनीच आपल्या शैक्षणिक संस्थेमार्फत संस्थानचे ठराविक नमुन्यातील अर्ज पाठवावेत. अर्जाची झेरॉक्स प्रत करून पाठविणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अर्जाच्या प्रती श्री साईबाबा संस्थान शिर्डी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर यांचेकडे मोफत मिळतील. पोस्टाने पाहिजे असल्यास स्वतःचा पत्ता असलेले ६० पैशाचे तिकीट लावलेले पाकिट अथवा ६० पैशाची पोस्टची तिकीटे पाठविल्यास प्रती मिळतील. छापील अर्ज मागविण्याची अंतीम मुदत दि. १६-८-८८ तर भरलेले अर्ज स्विकारण्याची अंतीम मुदत दिनांक ३१-८-१९८८ अशी आहे. मुदतीनंतर आलेल्या किंवा अपुरी माहिती असलेल्या, वरील अटी पूर्ण होत नसलेल्या अपात्र अर्जांचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहारही केला जाणार नाही.**

# साई तारी त्याला कोण मारी

- डॉ. पी. सावंत
(अनेस्थेटिस्ट)
बी. जे. वाडीया हॉस्पिटल,
परेल, मुंबई-४०० ०१२.

वरील वचनाचा अनुभव अनेक साईभक्तांना आला असेलच. तसाच मलासुध्दा आला.

माझी एम्.बी.बी.एस्.ची परीक्षा चालू होती. दुसरा पेपर संपवून मी व माझी मैत्रीण टॅक्सीने हॉस्टेलकडे निघालो होतो. सकाळी जाण्यासाठी मी व संध्याकाळी येताना तिने पैसे भरावे, असे ठरल्यामुळे तिने पैसे भरले व आम्ही हॉस्टेलच्या खोलीजवळ आलो. खोलीच्या चावीसाठी मी माझी पर्स बघणार, तो पुस्तकांच्या पिशवीत पर्स नव्हती. माझ्या काळजात धस्स् झाले, कारण पर्समध्ये पास, परीक्षा म्हणून कमी जास्त पैसे व मुख्य म्हणजे परीक्षा हॉल ओळखपत्र होते, ज्या कारणामुळे मला दुसऱ्या दिवशीच्या पेपरला बसता येणार नव्हते व अजून तर तीन पेपर बाकी होते. हॉस्टेलच्या आसपास खूप शोधाशोध केली. बरे चुकून टॅक्सीत विसरले असेन, तर टॅक्सीसुद्धा केव्हाच निघून गेली होती. घाईगडबडीत मी टॅक्सीचा नंबरदेखील पाहिला नव्हता. मला काय करावे, सुचत नव्हते व दुसऱ्या दिवशीच्या पेपरचा अभ्यासही होत नव्हता. अशातच बाबांना मी प्रार्थना केली. लगेच मी आईवडिलांना फोन करून कळविले. वडिलांनी येऊन समजावले व साईबाबांचे नाव घेऊन स्वस्थ चित्ताने दुसऱ्या पेपरचा अभ्यास करण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी वडील सकाळी परीक्षा केंद्रावर गेले व विचारपूस केली असता, कळले की, एक पर्स सापडली आहे व कॉलेजच्या ऑफिसमध्ये ठेवली आहे. नंतर विचारले असता, कळले की, एका कॉलेज-कर्मचाऱ्याला ती मिळाली व त्याने ती कॉलेजच्या प्राचार्यांकडे नेऊन दिली. काहीही पैसे न जाता पर्स मला परत मिळाली. मुख्य म्हणजे, त्या दिवशीच्या पेपरमध्ये मानसिक तणाव असताना व काहीही अभ्यास न करता, साईकृपेने मी चांगल्या मार्कांनी पास झाले.

दुसरा अनुभव असा, एम्.बी.बी.एस्. नंतर मला पोस्टग्रॅज्युएशन करावयाचे होते परंतु अतिशय स्पर्धा असल्यामुळे मला पी.जी. ॲडमिशन व हव्या त्या शाखेमध्ये मिळणे, जवळजवळ अशक्यच होते. मला वाईट वाटत होते, पण मी काहीच करु शकत नव्हते. थोड्याच दिवसांनी माझ्या मैत्रिणीने मला कळविले की, फायनल लिस्ट लागली आहे व त्यात तुला ॲडमिशन आणि ते सुद्धा तुला हव्या त्या शाखेमध्ये मिळाले आहे, ताबडतोब येऊन पैसे भरणे. मनोमन मी बाबांना अंतःकरणपूर्वक नमस्कार केला व खूप आभार मानले.

धन्य ते साईबाबा व साईलीला! बाबांची कृपा सर्वांवर अशीच राहो, हीच साई चरणी प्रार्थना.

# ओढ लागली शिर्डीची

चला-चला, शिर्डीला जाऊ।
साईबाबा, डोळे भरूनी पाहूं॥
सुखदु:खाच्या गोष्टी सांगू।
जीवनभर, साई हाती सोपवूं॥
पंचामृत - गुलाबपाणी, साईंना न्हाऊ घालूं।
सुगंधित अष्टगंध, भाळी लावूं॥
रेशमी-मुलायम सदरा, अंगी घालूं।
शोभिवंत जरी-पटका, डोई बांधू॥
नक्षीदार शेला, मायेने पांघरू।
शीतल, वाळ्याचा पंखा, चवऱ्या ढाळू॥
मधुर, सुवासिक मोगराहार, कंठी घालूं।
टवटवीत गुलाब पुष्प, शिरीं ठेवूं॥
मृदुल फुलांच्या पायघड्या, प्रेमभावे अंथरू।
वेल-तुळस, दुर्वा-मरवा पदकमली वाहूं॥
केशरी पेढे, मलई, बर्फी, नैवेद्य दाखवूं।
सवे मसाला दूध, फळे, कधी न विसरूं॥
अलंकार - नोटा - नाणी, दानपात्री टाकूं।
मन माझे दक्षणा, साईनाथार्पण करूं॥
सुगंधित उदबत्ती-धूप, आणि समई लावूं।
साजूक तुपाची पंचारती, श्रध्देने ओवाळूं॥
आरती-प्रार्थना-नमन, भक्तिने गाऊं।
मंगलमय घटिका, देहभान विसरूं॥
रूप मनोहर - तेज आगळे, मनामधे साठवूं।
श्रध्देने, आदराने, साईपदीं लीन होऊं॥
आशीर्वादाची गठडी, नम्रतेने उचलूं।
श्रध्दा-सबुरीचे बळ, पाठीशी बांधू॥
गोड चिंतनात, गोड प्रसाद, मुखी घालूं।
लीलाकरी उदी, भाविकतेने कपाळी लावूं॥
सुखस्वप्नांच्या गाडीतूनी, सुखाचा मार्ग धरूं।
बहार खुषीचा, धुंदीतच, गृहप्रवेश करूं॥

**– सौ. निलिमा ज. नाईक**
११ ॐ विवेकानंद को. ऑ. हा. सो.,
शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व),
मुंबई - २४.

# परम कृपाळू साईबाबा

– कु. स्वामी वसंतराव ढमढेरे
१८०, सरदार पेठ, शिरूर (घोडनदी),
ता. शिरूर, जि. पुणे-४१२२१०.

'बाबा', खरेच 'बाबा' गुरू, वडील माझे सर्वकाही आहेत. साई – आई या दोन शब्दांत किती साम्य आहे. आणि खरेच बाबा म्हणजे आई, वडील, गुरू, मार्गदर्शक सर्व काही बाबाच आहेत.

अगदी लहानपणापासून मला बाबांची ओढ आहे. जेव्हा मन उदास होते, तेव्हा 'बाबा' आपल्या पाठीशी आहेत, याची जाणीव कुठेतरी दिलासा देत असते.

आतापर्यंत बाबांनी खूप काही चांगले दिले. आता नंतरही बाबांनी हातून चांगले काही करवून घ्यावे, असे वाटते. आतापर्यंत बऱ्याच चुका घडल्या, प्रत्येक वेळी बाबा त्यातून मार्ग दाखवत गेले. अनेक वेळा संकटे आली, बाबांनी कुठल्या ना कुठल्या मार्गांनी सावरले. कधी एखाद्या घटनेच्या स्वरूपात, कधी एखाद्या व्यक्तीच्या रूपात बाबा धावून आले.

माझा बारावी सायन्सचा रिझल्ट आला. त्यावेळी मार्कशीट कॉलेजने अडवून ठेवले, कॉलेज फी भरली नाही म्हणून. सगळीकडची ॲडमिशन्स् बंद झाली. फी अभावी मार्कशीट, कॉलेज दाखला मिळेना. त्यावेळी ऐन शेवटच्या क्षणी कॉलेजचे प्राचार्य म्हणाले, तुझी फी मी भरतो. त्यांनी फी भरली. मार्कलिस्ट मिळाले. पण तोपर्यंत सगळीकडच्या ॲडमिशन्स बंद. शेवटी बाबांचा धावा केला आणि अचानक त्या वर्षी आयुर्वेद कॉलेजमधल्या दहा जागा वाढल्या आणि नंतरच्या यादीमध्ये आयुर्वेद (बी.ए.एम्.एस.) ला प्रवेश मिळाला.

शिक्षण चालू असताना अनेक वेळा आर्थिक अडचणी येतात, पण बाबा त्यातून मार्ग काढतात. अर्थात 'श्रध्दा आणि सबुरी' या दोन वचनांवर नितांत श्रध्दा असावयास पाहिजे.

काही दिवसांपूर्वी आई खूप आजारी होती. औषधोपचारांनी गुण येईना, तेव्हा बाबांची उदी लावली आणि हळूहळू तिला बरे वाटू लागले.

आपल्या मनात शिर्डी क्षेत्री जाण्याची इच्छा असेल, तर बाबा ती कधीच अपूर्ण ठेवत नाहीत. साईक्षेत्री गेल्यापासून ते परत येईपर्यंत सर्व काळजी बाबा घेतात. 'तुमचा मी भार वाहीन सर्वथा, नव्हे हे अन्यथा वचन माझे' या बाबांच्या वचनाचा प्रत्यय पदोपदी येत असतो. बाबांवर भार सोपवून निश्चिंत मनाने आपली कर्तव्ये करीत रहावीत. बाबांना त्यांच्या भक्तांनी वाईट वागलेले अजिबात आवडत नाही. अशा वाईट गोष्टींची जाणीव बाबा त्यांच्या भक्तांना सतत कशा ना कशा रीतीने देत असतात.

आज भारताच्या आणि परदेशातूनही विविध प्रांतातून लोक बाबांच्या चरणी धाव घेत आहेत. साई चरणी सगळे भेदभाव विसरून सर्व एक होतात. शिर्डी मंदिरातील

'साईपूजा' पहाताना याचे प्रत्यंतर येते. असा हा संत आज लाखो लोकांच्या जीवनाचे प्रेरणास्थान बनला आहे.

कारण बाबांची शिकवण साधी, सोपी आणि सरळ आहे. त्यात कडक व्रतवैकल्ये नाहीत, की बळी देणे, महापूजा घालणे असे प्रकार नाहीत. सतत साईनाम जप करा, बाबा तुम्हाला खरा आनंद मिळवून देतील. भगवद्गीतेतील श्रीकृष्णाची शिकवण आणि बाबांची शिकवण एकच आहे. निष्काम बुध्दीने कर्तव्ये करा, आणि माझ्या ठायी श्रद्धा ठेवा, त्याचे फळ तुम्हाला निश्चित मिळेल, याशिवाय आणंखी अवघड असे तत्वज्ञान बाबांनी सांगितले नाही. अहिंसा, सत्य, दया, क्षमा, शांती याचाच पुरस्कार बाबांनी केला.

शेवटी ज्या ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत, त्या बाबाच करवून घेतात. बाबांनी नेहमी जीवनाचा योग्य असा मार्ग दाखववावा आणि खरी मनःशांती मिळेल, अशा आयुष्यमार्गावर नेऊन सोडावे, अशीच साईचरणी प्रार्थना.

## ॥ आशिष दे मज परमकृपाळा ॥

आशिष दे मज परमकृपाळा
शरण तुला मी साईनाथा ॥

का सबुरीचा अंत पाहसी
का इतुके मज दूर लोटसी
तुझाच बालक पथ चुकलेला
करपाशी घे जवळी मजला ।

चहुकडे हा अंधार दाटला
गुदमरणारा मी जीव एकला
मार्गदीप होऊन तूच आता
नेशील ना रे मज पैलतिराला ।

ना आशेचा सूर राहिला
या जगाचा नूर बदलला
चित्त न रमते कशात आता
तूच रमवी मज तुझ्याच चित्ता ।

आशिष दे मज परमकृपाळा
शरण तुला मी साईनाथा ॥

– डॉ. राजेश रमेश परळकर
३६ जी, परळकर हाऊस,
परळ व्हिलेज, मुंबई-१२.

# आळवणी

(चाल – शूपर्णखा)

(कविवर्य गिरीश यांची क्षमा मागून)

मन गेले तुझ्या पदी जडून । साई मन गेले तुझ्या पदी गडून
किती उत्कंठित जाहलो
किती आशा धरुनी आलो
किती थकलो वाट बघून ॥साई मन... ॥१॥
मी शरणांगत तव पायी
भक्ति जडली तुझिया ठायी
दे दर्शन सदया येवून ॥साई मन... ॥२॥
किती आळवू तुज लागूनी
दे निष्ठुरता सोडूनी
जरा एकदाच बघ वळून ॥साई मन... ॥३॥
कां अंत असा पाहसी
छळवाद उगा मांडसी
कां गंमत बघसी दुरुन ॥साई मन... ॥४॥
मम आर्त हाक ऐकूनी
साई माऊली ये धावूनी
मजकडे बघतसे हसून ॥साई मन... ॥५॥
सर्वांग मोहरुन आले
मन आनंदे दाटले
सर्वस्व दिले त्या वाहून ॥साई मन... ॥६॥

**–श्री. भास्कर गो. जोशी**
साई प्रसाद, ४२ श्रीकृष्णनगर,
बोरीवली (पूर्व),
मुंबई–४०० ०६६

– मानवाने स्वतःचा उत्कर्ष आपल्या स्वतःच्या मनाच्या द्वारा केला पाहिजे. मानवाने स्वतःची अधोगती करता कामा नये. कारण मन हे बद्ध जीवाचा दोस्त आहे, तसेच, मन हे शद्ध जीवाचा शत्रूही आहे.

# प्रेमळ भगिनी - पोथी

साईनाथा सांगते मनीचे बोल उकलूनी
उभयहि आम्ही प्रेमळ भगिनी
ज्येष्ठ असे ज्ञानाची खाणी
नित्य करी ज्ञानाची शिंपणी
उभय करिती गुजगोष्टी कानी
एक वदे ज्ञानाची गाणी
रहस्य चारी वेदांचेही पोटी
ज्ञान निर्झरी हिचिया ओठी
प्राशून घेऊ निरंतर अमृत
जन्मोजन्मीचे पावन जीवित
साईनाथा, तव लीला अद्भुत
परि ती उकलून सांगते अविरत
एक त्रिभूवनी महान तूची
जलाविण तू तृष्णा शमविसी
प्रणाम करिते सुमन पोथीला
त्रिताप जीवनी तूच वारिला
पोथी केवळ माझी भगिनी
नमिते मी तिज श्रध्दा ठेवूनी
सु-मना हार अर्पियला हस्ती
सुमने सुमना धरिले कंठी

**सौ. सुमती खानविलकर**
सीताकुंज, मुक्ता नर्सिंग होम,
मुंबई-पुणे रस्ता, लोणावळा (पश्चिम)

— ज्याने मनाला पूर्णत: जिंकले आहे, त्याचा मन हे जिवलग मित्र होते, परंतु जो मनाला जिंकत नाही, त्याचे तेच मन त्याचा परम शत्रु होते.

# ॥श्री साई भजन॥

सोडा सोडा सोडा अभिमान
साईचे नाम आता तरी घ्याना
मुखाने साई राम म्हणाना
शिर्डीस जाता साईरूप पहाता
वाटे मना समाधान.
साईचे नाम आता तरी घ्याना
मुखाने साईराम म्हणाना ॥ १॥
मंदिरी जाता साई नाम घेता
संतांच्या मेळी भजनी बैसता
हरपूनी जाते देहभान
साईचे नाम आतातरी घ्याना
मुखाने साईराम म्हणाना ॥ २॥
माझे माझे स्वार्थ फुकाचे
माता पुत्र बंधु कुणी नाही कामाचे
हेची धरा तुम्ही आता ध्यान
साईचे नाम आता तरी घ्याना
मुखाने साईराम म्हणाना ॥ ३॥

**— सौ. लीला तानाजी सोनावणे**
श्रीदत्तनिवास, दत्तमंदिरामागे,
मु. पो. नवापूर, जि. धुळे - ४२५४१८

—जो मानव खाण्याच्या, झोपण्याच्या, कर्म करण्याच्या आणि करमणूक-क्रिडा करण्याच्या स्वतःच्या सवयीत नियमित असतो, त्याची सांसारिक दुःखे योगाभ्यासामुळे नष्ट होऊ शकतात.

# श्रीसाई तूं सर्वमंगला

श्रीसाई तू सर्वमंगला
सर्वार्थांची मंगलसिद्धी
अनंत कोटी ब्रम्हांडातील
तूच सफलता, तू समृध्दी ॥ १॥

तूं श्री, तूं धी, श्रद्धामेघा,
घृति, स्मृति, तूं तुष्टीपुष्टी
दया, स्पृहा, तू लज्जा कीर्ती,
स्वाहा, स्वधा, तू अमृतवृष्टि

ऋतंभरा तू प्रज्ञा दिव्या
ओंकारातील अर्धा बिंदू,
प्रबोधिनी तू दिव्य दिपिका
सत्रावीचा अमृत-सिंधू॥ ३॥

प्रथमकला की तू वेदांची
पंचमुखी गायत्री देवी
सरस्वती तू प्रणवरूपिणी
युगे युगे तव कीर्ती गावी ॥ ४॥

वीणावति तूं देवी शारदा
की ब्रम्हाची सखी सावित्री
झंकारातून मंत्र-ऋषींना
नव-सृजनाची देशी दृष्टी ॥ ५॥

तू लक्ष्मी, तू कमललोचना
तूच इंदिरा, वैष्णवभक्ती
पद्मनिवासा, हरिप्रिया
भागवतांची भगवत्प्रीती ॥ ६॥

तू अंबा, तू उमा, अपर्णा
हिमवंताची तू हिमगौरी
दाक्षायणी गे तू कात्यायनी
भद्रा, काली तू परमेश्वरि ॥ ७॥

तू रणदुर्गा, शिवा, भवानी
कामाख्या तू, त्रिलोचना तू
आर्या गिरिजा, शांतादुर्गा
तू भवसेतू, जीवन हेतू ॥ ८॥

त्रिशूलधारी तू रणचंडी
संहाराचे तांडव करिसी
नवे उद्याचे जग निर्माया
संग्रामाची धुंदी वरिसी ॥ ९॥

तू सृजनाची प्रथम प्रेरणा
अनंततेची तू अभिव्यक्ति
तू मुक्ती, तू वैष्णवभक्ति
शिवयोग्याची तू शिवशक्ती॥ १०॥

जगदंबा तू सिंहवाहिनी
शाङ्‌र्ग चापधर खड्‌ग-मंडिता
अष्टभुजा, तूं, तू नवदुर्गा
करूणामय श्री देवी ललिता ॥ ११॥

चंद्रबिंब-स्थित शक्ती अनघा
तू दत्तांची कृपा-पौर्णिमा
त्रि-भुवन सुंदरी श्री देवी तव
पसरे जगती गौरवमहिमा॥ १२॥

त्रिभुवन जननी तूं विश्वंभर
परमात्म्याची सगुणमाया
तूच जगाची धात्री मंगल
निर्गुणतेची गुणमय काया ॥ १३॥

देवी तूंच गे ज्ञानचित्कला
तूच सनातन विद्या आद्या
षट्चक्रातील कुंडलिनी तू
सकल-सिध्दिमय तू श्री विद्या ॥ १४॥

ब्रम्हांडातून उभारिशी तू.
देह-प्राण मन बुध्दि अहंकृती
संहारून ही माया करि मज
सच्चित् आनंदाचा यात्री ॥ १५॥

त्या अविनाशी परतत्वाचा
पंचविषमय तू संसार
संसारातित सिध्दानाही
पराशक्तिचा नकळे पार ॥ १६॥

सुधाण्वस्थित तुझे मपिव्दिंन
सकलवैभवे अखंड मंडित
तव करूणेचा, शरण्यतेचा
तिंथे चालला घोष अखंडित ॥ १७॥

श्री चक्रींच्या चक्र-देवते
तू हो माझी जीवनशक्ति
शब्दशारदा तुजला वाहन
घडवीन मी तव वाड्मयमूर्ती ॥ १८॥

**— चकोर आजगांवकर**
वाय ११, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व),
मुंबई - ५१.

# अभिनंदन

## श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षपदी श्री. मोहनराव पाटील



श्रीसाईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षपदी मा. श्री. मोहनराव रामराव पाटील, आय.ए.एस. (निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मा. डॉ. पी. के. सावंत यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे ही नवी नियुक्ती करण्यात आली. मा. श्री. मोहनराव पाटील यांनी महाराष्ट्र शासनात जिल्हाधिकारी, महासंचालक माहिती व जनसंपर्क, तसेच निरनिराळ्या मा. मुख्यमंत्र्यांचे व्यक्तिगत सचिव वगैरे उच्चपदे भूषविली आहेत. संस्थानची विविध सामाजिक विकास कार्ये जलद गतीने पार पाडण्याच्या दृष्टीने व संस्थानचा कारभार अधिक कार्यक्षमपणे होण्यास त्यांच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ होणार आहे.

# शिरडीवृत्त

## मार्च – १९८८

या. महिन्यात साईभक्तांची श्री साईबाबांच्या दर्शनासाठी बरीच गर्दी होती. श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज, शिरडी यांचा श्री रामनवमी उत्सव सालाबाद प्रमाणे शुक्रवार दि. २५ मार्च १९८८ ते रविवार दि. २७ मार्च १९८८ पर्यंत ३ दिवस साजरा झाला. दिवसेंदिवस श्री साईबाबांच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये, म्हणून श्री साईबाबा संस्थानने एक महिना अगोदर पासूनच तयारी ठेवली होती. त्यामुळे योजलेले सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले.

**उत्सवाचा प्रारंभ दिनः** शुक्रवार दि. २५ मार्च ८८ रोजी नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरूस्थान मार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर श्री साईसत्चरित्र अध्यायवाचनास सुरूवात झाली. दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. मनु महाराज कोकलेगांवकर, दासगणू प्रतिष्ठान आश्रम, गोरटे, जि. नांदेड यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७.३० ते ९ व ९.३० ते ११.०० पर्यंत आनंद संगीत विद्यालय, कोपरगांव यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्रौ ९.१५ ते ११.०० श्रींचे पालखीची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. स्थानिक लोकांनी व भक्त मंडळींनी मिरवणुकीचे वेळी गारूड, भारूड कार्यक्रम केले. श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे, सिने कलाकार यांचा भारूड कार्यक्रम झाला. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी मिरवणूक समाधी मंदिरात आली व शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवसः** शनिवार दि. २६ मार्च ८८ रोजी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने पहाटे पासूनच श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची रांग लागली होती. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व श्री साईसत्चरित्र ग्रंथ वाचन समाप्तीची मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर गावातून कावडी मिरवणुकीचा मोठा कार्यक्रम झाला. गावातील भाविक व साईभक्त आदले दिवशी रात्री कोपरगाव मुक्कामी गेले व गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६.३० वा. संस्थान विश्वस्तांनी कावडीची पूजा केल्यावर अंदाजे १२०० कावडींची मिरवणूक वाजत गाजत गावातून निघाली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर कावडी आणणाऱ्या प्रत्येकाने बाबांच्या समाधीस स्नान घातले. त्यांना प्रत्येक १ श्रीफळ देण्यात आले व लहान मुलांना प्रसाद म्हणून पेरू वाटण्यात आले.

सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत ह.भ.प. मनु महाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे रामजन्म आख्यान कीर्तन झाले. सायंकाळी ४ वा. श्रींच्या निशाणाची व ४.४५

वा. श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक आल्यानंतर धुपारती झाली. रात्रौ १० ते सकाळी ६.०० पर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा सांगता दिनः** रविवार दि. २७ मार्च १९८८ – नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त ह.भ.प. मनु महाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे कीर्तन १०.३० ते १२.३० पर्यंत झाले. दहीहंडी व माध्यान्ह आरती झाल्यानंतर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७.३० ते १० वा. डॉ. प्रभा अत्रे, मुंबई यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

काही कलाकारांनी श्रींच्या समोर आपल्या कलेच्या हजेऱ्या दिल्या.

**कीर्तनः** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी; संस्थान पुजारी, गवई,कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

३) ह.भ.प. विष्णुबुवा महादेव शुक्ल, डोंबिवली.

**प्रवचनः** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई.

**भजन, गायन, वादन इ.** कलाकार खालीलप्रमाणे–

आनंद के. आढावसर, ह.भ.प. बाबूराव नरोडे, प्रा. अविनाश घैसास, प्रा. सौ. पृथ्वीदेवी बिरारी, कु. अनुराधा भोकरे, श्री विकास किर्लोस्कर, श्री नितीन जोशी, कु. माधवी गुजराथी, कु. वर्षा जोशी, कु. सुनिता पिसाळ, कु. कविता भालेराव, कु. सुवर्णा कुलकर्णी, सौ. भारती पराडे, कु. स्वप्ना आढाव, कु. रूपाली भुतडा, कु. स्विती लोंगानी, श्री रविंद्र पिंगळे, श्री द्वारकानाथ लोगांनी, श्री संजय कुलकर्णी, श्री कृष्णा सिताराम शेकटकर, कु. तेजस बिरारी, कु. उज्वल बिरारी, श्री श्रीराम दत्तात्रय दहिवणकर, श्री यशवंत केशव बुधाळ, श्री मधुकर उपासने, श्री गोविंदभाई बाबुभाई रावड, कु. चारूशिला शशीकांत कुलकर्णी, श्री अनिल श कुलकर्णी, श्री भोलानाथ समेळ, श्री रावसाहेब देशमुख, श्री हरकचंद चंद्रभान, कु. शेखर नटवर विसपुते, क. केतन मिसळ, श्री पारस पोरवाल, क. सागर मिसळ, साकोरी, श्री वसंत गोपीनाथ काळोखे, शिरडी, श्री विजय पवार, लक्ष्मीवाडी, श्री वसंत दत्तात्रय वाळुजकर, डोंबिवली, श्री चंद्रशेखर गाडगीळ, पुणे, श्री रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे, श्री रत्नाकर कोराटे, शिरडी, श्री दौलतभाई, मुंबई, श्री डॉ. शरद पटेल, पुणे, श्री डॉ. श्रीकांत कीर्तने, पुणे, श्री दिलीप म महाश्वदे, भोपाळ, श्री दिव्यानंद नाथा, भोपाळ, श्री प्रभूनाथ जाधव, शिरडी, श्री गणेश भोईर. उरण, श्री नामदेव नागू भोईर, नवघण, श्री ज्ञानेश मुळगांवकर कु. प्रिती मुळगांवकर. मुंबई, श्री कचरू तरटे, नांदेड, श्री अनिल उत्तलवाल, नांदेड, श्री शंकर गणपत शेळके, कोल्हापूर, श्री चेतराम को लाखे, शिरवळ, सौ. शकुंतला जोशी, नाशिक, सौ. शरयू सा मराठे, शिरडी, श्री ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी, श्री रविंद्र नारायण शेडगे, कल्याण, श्री रामचंद्र

श्रीराम डोयकर, चिपळूण, श्री मुरलीधर म जाधव, कल्याण, कु. प्राणेश कुलकर्णी, लक्ष्मीवाडी, श्री विष्णु दयाल रविदास, उन्नाव, श्री माणिकराव धार्मिक, भिलाईनगर, श्री महेश मुळगांवकर, मुंबई, श्री भिमराव बनसोडे, साकोरी, श्री बाळासाहेब कुलकर्णी, लक्ष्मीवाडी, श्री दत्तात्रय कडोले, वैजापूर, श्री पुंजा भाऊराव दवंगे, शिरडी, श्री राममास्तर मुंगरूळकर, मुंगरूळ, श्री नागेश गुंडो जोशी, मातंलपूर, श्री उत्तमदास महाराज, शिरडी, श्री नटवर चुडामण विसपुते, शिरडी, श्री सखाराम राघुजी गुरव, कोपरगांव, श्री साहेबराव सोपान वदक, शिरडी, श्री मधुकर पुंडलिक सगर, गोगलगांव, सौ. बेबीताई शहाजी थोरात, संगमनेर, श्री रघुवीर शांताराम मिराणे, शिराडी, श्री मधुकर गणेश सुर्यवंशी, शिरडी, श्रीमती लक्ष्मी शिरवळकर, शिरवळ, श्री साहेबराव देवगुडे, पांथाळ, श्री नानासाहेब कोराटे, शिरडी, श्री नंदकिशोर पुरोहित, शिरडी, श्री रघुवीर खेडकर, संगमनेर, श्रीमती अनिता शिरवळकर, शिरवळ, सौ. मंदाताई खेडकर, संगमनेर, श्री कृष्णा मधुकर भगत, कोल्हार, श्रीमती विजया खर्डीकर, इंदौर, सौ. अनुसुया काशिनाथ लाखे, शिरवळ, श्री बालमभाई, रहाता, श्रीमती लालाभाई गुजराथ, शिरडी, श्री रामकृष्ण सखाराम गुरव, बेट, श्री सय्यद बाबा ढोली बाजा, रहाता, श्री साईलीला मंडळ, मुंबई, श्री शांताराम मिराणे, शिरडी, श्री बारावकर काका, शिरडी, श्री पवार गॅस वेल्डींग शिरडी, श्री रघुनाथ नागरे, शिरडी, श्री मधुकर निवृत्ती भालेराव, श्री माणिक साळी शिरडी, श्री ह.भ.प. मनुमहाराज कोकलेगांवकर, गोदा निवास, नांदेड, श्री दामोदर शास्त्री, भंडारकवठे, पंढरपूर, श्री रामचंद्र-गोविंद अरवाणकर, पंढरपूर, श्रीमती कमल पत्लेवार, नांदेड, श्री जी एस माळीवाडकर, साकरवाडी, सौ. उमा मनोहर कोकलेगांवकर, श्री एस.एस. कोटस्थाने, शिरडी, श्री मोहनराव आंबोडकर, लक्ष्मीवाडी, श्री सय्यद एस. एस. अ. नगर, श्री एकबोटे डी आर, अ. नगर, श्री जहागीरदार आय सी., अ. नगर, श्री एस एस वाघ, साकरवाडी, सौ. शालिनीताई मोहनराव आबोडकर, लक्ष्मीवाडी, श्री विजयराव पाटील, शिरडी, श्री व्ही रामदास, मुंबई, श्री कै. तुकाराम खेडकर, सह विवेकानंद मुळे, मांजरवाडीकर, श्री अरविंद बाबाजी जामसंडेकर, सौ अनुराधाबाई पिंपळगांवकर, श्रीमती कमलाबाई भावे, पुणे, श्री यशवंत नाईक, मुंबई, श्री एम एम पाटील, मुंबई, श्री विलास पावसकर, मुंबई, हैद्राबाद इलेक्ट्रीशियन्स, श्री प्रमोदकुमार, श्री आर श्रीनिवास, श्री मोहनराव, श्री शेखर, श्री यादगिरी, डॉ. प्रभा अत्रे, श्री अनंत राणे, सौ. शकुंतला जोशी, नाशिक, श्री साई शंकर, श्री एस डी कुलकर्णी, श्री विजय बाळाराम मोगरे, वरळी, श्री दत्ताराम कदम, श्री किशोर कदम, श्री शशांक तावडे, श्री सुनील चव्हाण, श्री सुरेश रा आंजूर्लेकर, श्री सतीश बा राव, श्री बारकु गुणाजी मांडवकर, श्री शशीकांत एकनाथ दळवी, श्री सुभाष कांबळी, श्री वसंत जोशी, श्री दत्ताशेठ रेळेकर, श्री दामोदर कोरावत, श्री बाबूराव नरे, श्री अण्णा पाटील, श्री देवा शिंदे, श्री बाबा जाधव, श्री कैलास गायकवाड, श्री प्रकाश म्हात्रे, श्री राजू शिर्के, श्री प्रकाश जोशी, श्री दिनेश सुर्वे,

श्री विश्वनाथ गुलन, श्री कृष्णा गुडाग, श्री नथुराम पाटील, श्री शांताराम कळमकर, श्री शशी जाधव, श्री कमलकर वर्तक, श्री सदानंद दारीयाना, श्री किशोर जाधव, श्री संजय गायकवाड, श्री राजेश पोवळे, श्री तुकाराम मुळभ, श्री अनिल मयेकर, श्री संतोष पुरी, श्री वेलु बील्ले, श्री प्रविण हडकर, श्री सुरेश बाईत, श्री रविंद्र परब, श्री रमेश घाडी, श्री जितेंद्र कानडे, श्री विलास पोमेडकर, श्री संजय धुरी, श्री शशीकांत जाधव, श्री मधुकर मसुरकर, श्री हेमंत हळदणकर, श्री नागेश हाडगे, श्री मारूती मांजरेकर, श्री अरविंद पवार, मुंबई, श्री विलास महाडिक, श्री सुदाम परकर, श्री विजय बोगरे, श्री विलास परळकर, मुंबई, श्री रमेशभाई गोविंदराम साहेब, श्री शरद गायकवाड, श्री शांताराम लक्ष्मण कळंबकर, श्री बाळू शिर्की, श्री चंद्रकांत फाळके, श्री चंद्रकांत विर्नेरकर, श्री बाबल्या देवजी पालमकर, श्री प्रकाश देवरूखकर, श्री पांडुरंग सकपाळ, श्री महेश कोकम, श्री अनिल गावकर, श्री प्रभाकर महादे, श्री प्रकाश गाटेकर, श्री विलास तांबे, श्री दिपक वजे, श्री मंगेश सकपाळ, श्री पुरूषोत्तम जाधव, श्री प्रदीप खैरनार, श्री संतोष मिराशी, श्री सुनील आंग्रे, श्री सुधीर जावकर, श्री शंकर सकपाळ, श्री नंदु चव्हाण, श्री बांदेकर, श्री रमेश डी चव्हाण, नवापूर, श्रीमती सरोजबेन चंदुलाल बाराटे, सौ. कुसुम रमेश चव्हाण, श्री महेंद्र रामदास चव्हाण, श्री निवासन बांदे, श्री प्रमोद यशवंत इंगळे, सांताक्रूज, श्री भाई कदम, दादर, श्री विनायक प्रधान, भांडुप, श्री सुरेश सुखीजा, फरिदाबाद, कु. संध्या श्रीराम यादव, शिरडी, श्री के व्ही रमनमूर्ती, राजमंडी, के. सत्यनाती, श्री प्रमोद धारकर, भोपाळ, श्री आचार्य भारद्वाज, ओंगोल, श्री विजय नामदेव गोरे, गिरगांव, श्री हीरालाल बेला, खरगपूर, श्री रतनलालजी शर्मा, नागपूर, श्री जावेद करीम सय्यद, शबाना ढोलीबाजा, शिरडी, श्री चंद्रशेखर वि शुक्ल, श्री गोविंदभाई बिरावळ, बरोडा, श्री एम एम पांडुरंगराव, सिकंदराबाद, इ.

**रंगपंचमी:** सालाबादप्रमाणे मंगळवार दि. ८.३.८८ रोजी सायंकाळी ५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून मिरवून आल्यावर ६.३० वाजता धुपारती झाली.

**गुढीपाडवा:** सालाबादप्रमाणे शुक्रवार दि. १८.३.८८ रोजी सायंकाळी ५ वाजता श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून मिरवून आल्यावर ६.३० वा. धुपारती झाली.

# एप्रिल – १९८८

या महिन्यात शिरडीस श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्त मंडळी नेहमीप्रमाणे आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे:—

**कीर्तन:** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी, गवई, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

३) ह.भ.प. श्री. अरविंदबुवा आगाशे, फलटण.

**प्रवचनः** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी, गवई.

**भजन, गायन, वादन इ.:** जे. शोभा, हैद्राबाद, श्री. प्रकाश यशवंत सावंत कल्याण, श्री. दिपक पांचाळ, मुंबई, श्री. गजेंदरसिंग ठाकूर, हैद्राबाद, कु. संगीत महाडीक, लोकनाट्य मंडळ, समनापूर, श्री. राजाबुवा आगाशे, फलटण, श्री. संज वासुदेव मेस्त्री, मुंबई, श्री. जनार्दन सुब्रम्हण्यम्, सेसाला, अंधेरी, श्री. चंद्रशेख फणसे, अंधेरी, श्री. कृष्णा विनायक वाघ, अवसरी, श्री. शशीकांत विठ्ठल बाणखेले मंचर, श्री. रवीराज शिवाजी पेठकर, पुणे, श्री. चंद्रकांत भगवान साखरपेकर, मुंबई श्री. बी. मोहनराव, अनंतपूर, श्री. अरूण सोमाजी, संगमनेर, श्री. शिवराम बिडवे संगमनेर, श्री. अंबिका भजन मंडळ, उरणे, श्री. अनिल पंढरीनाथ उत्तरवार, नांदेड श्री. दिपक पांडुरंग पाटील, पुणे, श्री. लक्ष्मण गोपाळ ताकवडेकर, कोल्हापूर, श्री विश्वास दत्तात्रय साळुंखे, कोल्हापूर, श्री. चंद्रकांत पारकर, मुंबई, श्री. गजान भजनी मंडळ, रिसोड, सौ. गीता सं. जावडेकर, मालाड, श्री. महेंद्र दवे, अहमदाबाद व्ही. रामकृष्ण, ओंगोल.

**कै. भाऊ महाराज कुंभार पुण्यतिथीः** सालाबादप्रमाणे साई समकालीन भक्त संत श्री. भाऊ महाराज कुंभार यांची पुण्यतिथी बुधवार दि. १३.४.८८ रोजी साजरी करण्यात आली. माध्यान्ह आरतीनंतर त्यांचे प्रतिमेची मिरवणूक लेंडीबागेजवळील त्यांचे समाधीजवळ गेली. तेथे समाधीस स्नान, पूजा, आरती झाली व उपस्थितांना शिरा प्रसाद वाटण्यात आला.

# मे – १९८८

या महिन्यात शिरडीस श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्त मंडळी नेहमीप्रमाणे आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे.

**कीर्तनः** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान-पुजारी, गवई, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**प्रवचनः** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी.

**भजन, गायन, वादन इ.:** १) श्रीमती अलका भालचंद्र रिसवडकर, अंधेरी २) श्री. यासीन म्हांब्री, कोल्हापूर ३) श्री. बबनराव जाधव ४) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे ५) श्री. कासम मुल्ला ६) श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण कानकेकर जोगेश्वरी ७) सौ. नीलम दिलीप चौबल ८) श्री. दामु आण्णा दळवी श्रीरामपूर ९) श्री. शाम गोविंद खंडागळे १०) श्री. विजय गायकवाड ११) श्री विद्युत नाईक, सांताक्रूज १२) श्री. नारायण मोरेश्वर चुरी, चिंचणी १३) श्री.

एन. व्ही. गुप्ता, हैद्राबाद १४) शिवशक्ती भजन मंडळ, कॉम्रेज १५) श्री. बुधादित्य मुखर्जी, भिलाई १६) बिलमेंदु मुखर्जी १७) डॉ. व्यंकटेश पांडुरंग हेगड़े, मडगाव १८) श्री. अनिल केशवराव रसाळ, वडाळा १९) योग मित्र मंडळ, हैद्राबाद २०) मुरलीधर भजनी मंडळ, बार्शी २१) अतुल सत्यप्रसाद देंव, कळवा २२) श्री. टी. व्ही. माधवराव २३) साईनाथ भजनी मंडळ, शिरडी २४) श्री. हसमुख ओंकार पाटील, नवापूर २५) श्री. प्रकाश गोविंद पालवणकर, वसई २६) श्री. साहु भोसले, मुंबई २७) श्री. रघुनाथ कटारें, मुंबई २८) श्री सत्यसाईबाबा मंडळ, लाखनपूर २९) श्री. वासुदेव तायडे, ग्रामसी ३०) श्री. वसंत फडणवीस, मुंबई.

## बाबांची आरती

साईंची आरती, घेईन माझे हाती ॥ धृ.॥
सुवर्णाच्या तबकात निरांजने झळकती
सत्य धर्म प्रेम शांती तेवतात चारी ज्योती ॥ १॥
कापराचा शुध्द गंध पसरतो सभोवती
आरतीचे सुस्वर साती गुरूराय ऐकताती ॥ २॥
दिसे त्यांच्या नयनात समाधान दैवी तृप्ती
आरतीच्या शब्दामध्ये भाव एक शरणागती ॥ ३॥
अर्चनात भोळी भक्ती वाढविते साईप्रीती
आरतीच्या समाप्तीत साई आशिष संपत्ती॥ ४॥
बाबांची आरती घेईन माझे हाती ॥ धृ.॥

**— प्रा. डॉ. माधव चिंतामण दीक्षित**
एम.ए., एम.कॉम., पी.एच.डी.
१२०६/३२ ए, शिरोले नगर,
पुणे - ४११००४.

# साईनाथा साईनाथा

साईनाथा साईनाथा आलो तुझिया द्वारी
माता पिता बंधू सखा माझा तूच मला तारी ॥ धृ.॥
मी ग्रासलो काम क्रोध मद मोह मत्सराला
सोडवी तूचि मला या मायाजालांतरी ॥ १॥
मम देहाचे सार्थक करी तूचि आता
पुढे न बोलवे मजला समजूनी घे या भावनांपरी ॥ २॥
पाहुनी तुजे रूप, मज सुचे ना काही
प्रसन्न ते दर्शन, तयाची गोडी हृदयापरी ॥ ३॥
मी दीन पामर काय वर्णू, तुज थोरवी
शब्द हे अपुरे प्रडतात सांगायापरी ॥ ४॥
चमत्कार तुझे पाहुनी
मस्तक लीन होते तव चरणांवरी ॥ ५॥

**- श्री. अरविंद गवई**

# कवडसे

जीव तुहा न माहा कोनीसारखा मानते।
आत्मा एकच मनते भेदभावच करते ॥ १॥
एका भेटे तुप रोटी दूज्या भाकर कोरडी।
एकीले भारी साडी दुजी गाठीची नेसते ॥ २॥
माय एका भावाची मोहन माळी न सजते।
माह्या मायच्या गळ्यात काळा मनीच दिसते ॥ ३॥
पोरगं मरते मोठ्याच सारा गावच लडते।
माह्या पोराच मरन येटाळात मुक होते ॥ ४॥

**- श्री. हरीभाऊ बोबडे (पांडुरगात्मज)**
एम. ए. बी. एड.
मु. पो. अंजनसिंगी, ता. तिवसा
जि. अमरावती

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |